मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २९३ ■ सोमवार, ०६ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# पनवेल शहरासह तालुक्यात मुसळधार पावसाचा कहर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल शहरासह संपूर्ण तालुक्यात शनिवारी रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः कहर केला असून अनेक सखल भाग जलमय झाले आहेत. नांदगाव व डोलघर या गावांकडे जाणारे प्रमुख रस्ते पाण्याखाली गेल्याने दोन्ही गावांचा बाहेरील भागाशी संपर्क तुटला आहे. त्यामुळे ग्रामस्थांना दैनंदिन कामांसाठीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रविवारी सकाळपासून नांदगाव आणि डोलघर परिसरातील नागरिकांना होडीच्या साहाय्याने प्रवास करावा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षितपणे पाण्याच्या





प्रवाहातून बाहेर काढण्यात येत होते. सततच्या पावसामुळे नदी-नाले, ओढे आणि खाड्या दुथडी भरून वाहत असून पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे.

**शहरातील प्रमुख रस्ते पाण्याखाली**

पनवेल शहरातील गांधी नदी दुथडी भरून वाहत असून वडाळे तलाव पूर्ण क्षमतेने भरला आहे. तलावाचे पाणी रस्त्यावर आल्याने जुने भाजी मार्केट परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. उरण नाका परिसरातही रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली. साचलेल्या पाण्यात अनेक वाहने बंद पडल्याने वाहनचालकांची तारांबळ उडाली. मुस्लीम नाका येथे मोठ्या नाल्याचे पाणी रस्त्यावर आल्याने परिसर जलमय झाला, तर बावन बंगला भागात भरतीच्या पाण्यामुळे काही घरांमध्ये पाणी शिरले. कर्नाळा (खारपाडा) नाका परिसरातील काही दुकाने आणि घरांमध्येही पाणी घुसल्याने नुकसान झाले आहे.

**सर्वत्र पूरस्थिती; नागरिकांमध्ये चिंता**

पनवेल-उरण मार्गावरील करंजाडे गावाजवळील गाढी नदी परिसर, गणेशनगर, विचुंबे आणि उसर्ली गावांमध्येही पूरस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. परिसरात सर्वत्र पाणीच पाणी दिसत असून प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

**२५९ नागरिकांचे स्थलांतर**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पटेल मोहल्ला, कच्ची मोहल्ला आणि भारतनगर झोपडपट्टी परिसरात पाण्याची पातळी वाढल्याने प्रशासनाने तातडीने नागरिकांचे स्थलांतर केले. उर्दू शाळेत १४९ तर कोळीवाडा शाळेत ११० अशा एकूण २५९ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली भांडारपाल प्रकाश गायकवाड व त्यांच्या पथकाने स्थलांतरित नागरिकांसाठी चहा, बिस्किटे, पिण्याचे पाणी, नाश्ता व जेवणाची व्यवस्था केली आहे. तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

- रस्ते जलमय, अनेक गावांचा संपर्क तुटला
- नांदगाव–डोलघरकडे जाणारे रस्ते पाण्याखाली
- नागरिकांची होडीतून ये–जा
- उरण नाका, जुने भाजी मार्केट, बावन बंगला परिसर जलमय
- २५९ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

**प्रशासनाचे आवाहन**

सततच्या पावसामुळे परिस्थिती गंभीर बनत असून नागरिकांनी अनावश्यक घराबाहेर पडू नये, पूरग्रस्त रस्त्यांवरून जाण्याचा प्रयत्न करू नये तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने पुढील काही तास मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासनाने खबरदारीचे उपाय अधिक तीव्र केले आहेत.

# मनसे कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश

- •नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या तत्परतेने धोकादायक खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती
- •पत्रकार आणि मनसे कार्यकर्त्यांनी मांडली समस्या; दुसऱ्याच दिवशी कामाला सुरुवात

**नवी पनवेल, प्रतिनिधी दिपक कोळवणकर :** सेक्टर 13 येथील अय्यप्पा मंदिर, तीर्थ द्वारका बिल्डिंगसमोरील सुकापूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर महानगर गॅस लाईन टाकण्यासाठी करण्यात आलेल्या खोदकामानंतर खड्डे माती व खडीने भरून ठेवण्यात आले होते. गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे हे खड्डे जवळपास दीड ते दोन फूट खोल खचल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण होत असून अपघाताचा धोका देखील वाढला होता.





या गंभीर समस्येची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे विभागीय अध्यक्ष किरण गावडे मा: सुकापुर विभाग अध्यक्ष राज क्षीरसागर यांच्यासह मनसे सैनिक स्वप्निल सोनावणे, महेश मोरे, विजय खकाळ आणि सुमित कदम यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर दैनिक युवक आधारचे महानगर प्रमुख पत्रकार जगदीश क्षिरसागर यांच्याशी संपर्क साधून ही बाब संबंधित लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचविण्यात आली.

यानंतर प्रभाग क्रमांक 17 चे नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची सविस्तर माहिती देण्यात आली. त्यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत, "उद्यापासूनच दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात येईल. नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची पूर्ण काळजी घेतली जाईल," असे आश्वासन दिले.

नगरसेवकांनी दिलेला शब्द पाळत दुसऱ्याच दिवशी दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच मनसे कार्यकर्ते आणि पत्रकारांनी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या तत्परतेबद्दल आभार मानले.

नागरिकांच्या समस्या वेळेत सोडविण्यासाठी जागरूक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि तत्पर लोकप्रतिनिधी यांचे समन्वयाने कार्य होणे हीच सुशासनाची खरी ओळख आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# इंडीयास प्राइड अवॉर्डने डॉ. प्रियांका डोके- मंडलिक सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : भारतीय सिनेयुग प्रोडक्शन आणि अकादमी मुंबई यांच्या तर्फे इंडीयास प्राइड अवॉर्ड 2026 या कार्यक्रमात नवी मुंबईच्या डी वाय पाटील विधी महाविद्यालयाच्या एचसी एलएलएम को ऑर्डिनेटर एचडी आणि प्रोफेसर डॉ.प्रियांका डोके मंडलिक यांना त्यांच्या कार्याचा गौरव करत इंडीयास प्राइड अवॉर्डने गौरविण्यात आले. कारगिल युद्धात देशाचे रक्षण करताना आपले दोन्ही पाय गमावलेल्या सैनिक अधिकारी यांच्या हस्ते डॉ. प्रियांका डोके मंडलिक यांचा गौरव करण्यात आला. या



कार्यक्रमाला निवृत्त न्यायाधीश, अनेक वकील, तसेच पोलिस अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रोफेसर डॉ. प्रियंका मंडलिक यांनी कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिस अधिकारी यांचे विशेष आभार मानले.

सण असो किंवा इतर कोणताही प्रसंग असो घर दार विसरून पोलिस हे आपले कर्तव्य पार पाडून सामान्य जनतेच्या हितांचे रक्षण करीत असतात असे त्यांनी सांगितले.




# पाताळगंगा पुरात २० जणांची धाडसी सुटका

## वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दिनांक ४ व ५ जुलै २०२६ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. खारपाडा–आपटा तसेच आपटा फाटा–रसायनी मार्गावर मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी आल्याने वाहतूक पूर्णपणे बंद झाली होती. पुराच्या पाण्यात मिनी बस, लक्झरी बस व इको अशा तीन गाड्या अडकल्या होत्या.रोहा येथून रसायनीकडे जाणाऱ्या मिनी बसमध्ये चालकासह १६ प्रौढ स्त्री-पुरुष व ३ लहान मुले असे एकूण २० जण अडकले होते. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश संकपाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शशिकांत पवार तसेच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार संजय गावडे, जितू कदम, आदिनाथ आघाव, राकेश बर्डे, दत्ता उबाळे, जयेश पाटील व बाबा काचकुंडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.पोलीस अंमलदार जयेश पाटील व राकेश बर्डे यांनी ग्रामस्थ सूर्यकांत घरत यांच्या मदतीने पुराच्या पाण्यात अडकलेल्या मिनी बसपर्यंत पोहोचून सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढत सुरक्षितस्थळी हलविले. त्यानंतर एनडीआरएफ पेन व रिलायन्स रेस्क्यू टीमच्या मदतीने अडकलेली बस बाजूला काढण्यात आली तसेच बोटीच्या सहाय्याने परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली.पोलीस उपायुक्त डॉ. राहुल खाडे





यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी दोन्ही बाजूंनी रस्ता बंद करून प्रवासी व वाहनांना पर्यायी मार्गाने रवाना केले. सलग दोन दिवस सुरू असलेल्या मुसळधार



पावसात नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी गोवा रोड, जुना पुणे रोड आणि रसायनी रोडवर अहोरात्र मेहनत घेत वाहतूक कोंडी होणार नाही याची विशेष खबरदारी घेतली.या संपूर्ण घटनेत कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नसून, स्वतःचा जीव धोक्यात घालून २० जणांचे प्राण वाचविणाऱ्या तसेच वाहतूक सुरळीत ठेवणाऱ्या नवीन पनवेल वाहतूक पोलिसांच्या धाडसी आणि तत्पर कार्याचे जनतेतून सर्वत्र कौतुक होत आहे.

# भर पावसात वाहतूक पोलिसांचे वाहतूक नियोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : मुसळधार पाऊस कोसळत असताना देखील भर पावसात न्हावा शेवा वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन केले. गेल्या काही दिवसांपासून पनवेल उरण परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे याचा परिणाम वाहतूक कोंडीवर देखील होत आहे वाहतूक पोलीस वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी सतत प्रयत्नशील असतात.



4 आणि 5 जुलै रोजी न्हावा शेवा वाहतूक शाखा आवारात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. या ठिकाणच्या जेएनपीटी येथे मोठ्या प्रमाणात जड अवजड वाहनांची रहदारी असते. या सर्व जड अवजड वाहनाचे वाहतुकीचे नियोजन वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलांडे या स्वतः रस्त्यावर हजर राहून करत आहेत. पावसामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने रस्त्यावर उतरले आहेत. एक महिला अधिकारी रस्त्यावर भर पावसात रस्त्यावर उतरून काम करत असल्याने नागरिकांनी कौतूक केले आहे.

# पनवेल शहरातून रिक्षा चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहर रेल्वे स्टेशन रोडवरील शिवाजीनगर येथील ५० नंबर बसस्टॉप परिसरातून एमएच ४६ एझेड ८३७१ क्रमांकाची रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी घडली. या प्रकरणामुळे रिक्षाचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, चोरीस गेलेली रिक्षा नुकतीच नव्याने तयार करण्यात आली होती. रिक्षेमध्ये साऊंड सिस्टीम व स्पीकरचीही व्यवस्था करण्यात आली होती. रिक्षेचा उपलब्ध फोटो जुना असला तरी वाहनाचा क्रमांक एमएच ४६ एझेड ८३७१ हाच असल्याचे मालकांनी स्पष्ट केले आहे. रिक्षा चोरी झाल्यानंतर मालकांनी परिसरात शोधाशोध सुरू केली असून नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित रिक्षा कोणाला आढळल्यास अथवा तिच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ खालील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संपर्क : तोफिक अब्दुल बागवान – ९०८२४४६०४४ सादिक अब्दुल बागवान – ८८९८९२९७०२/७०२११५५४२१

# तरुणाईच्या उत्साहात रंगला ‘भूतम भयम्’च्या ‘पैशाचा पाऊस’ रॅपचा म्युझिक लॉन्च!

## पिल्लई महाविद्यालयात विद्यार्थ्यांसोबत जल्लोषात झाला गाण्याचा अनावरण सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी )** : मराठीतील आगामी हॉरर-कॉमेडी चित्रपट ‘भूतम भयम्’ सध्या चांगलाच चर्चेत आहे. भन्नाट कथा, नव्या पिढीतील लोकप्रिय कलाकार आणि हटके सादरीकरणामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. नुकतंच चित्रपटातील ‘पैशाचा पाऊस’ रॅप प्रदर्शित झालं असून, त्याचा म्युझिक लॉन्च रसायनी येथील पिल्लई महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत आणि जल्लोषात पार पडला.

या वेळीपिल्लई महाविद्यालयाच्या संचालक - पीआर, पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, डॉ. निवेदिता श्रेयन्स, प्रिन्सिपलं डॉ.जे.व्ही.बकाल,डॉ. अमर मांगे,डॉ.रिंकू शंतनू,डॉ.केतन विरारचे,अमृत देशपांडे आणि विदयार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या खास कार्यक्रमासाठी चित्रपटाची संपूर्ण टीम महाविद्यालयात उपस्थित होती. विद्यार्थ्यांनी कलाकारांचं जोरदार स्वागत केलं. गाणं प्रदर्शित होताच सगळीकडे एकच उत्साहाचं वातावरण




निर्माण झालं. विद्यार्थी गाण्याच्या तालावर नाचू लागले, जल्लोष करू लागले आणि संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला. यावेळी विद्यार्थ्यांनी ‘भूतम भयम्’ मधील गाण्यावर खास डान्स सादर करून टीमला सुखद सरप्राइज दिलं. कलाकारांनीही विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि त्यांच्यासोबत अनेक सुंदर क्षण अनुभवले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून ‘पैशाचा पाऊस’ रॅपने तरुणाईची पसंती मिळवल्याचं स्पष्ट दिसून आलं.

या रॅपमधून सात मित्रांची धमाल मैत्री पाहायला मिळते. भन्नाट बीट्स, हटके रॅप आणि पिक्चरायझेशनमुळे हे गाणं पहिल्याच ऐकण्यात लक्ष वेधून घेतं. या गाण्याचे बोल श्रेयस सागवेकर आणि श्रीनाथ म्हात्रे यांनी लिहिले असून, संगीत श्रीनाथ म्हात्रे यांनी दिलं आहे. ‘तांबडी चामडी’ या गाण्यामुळे घराघरांत पोहोचलेला फेमस रॅपर श्रेयस सागवेकर याने ‘पैशाचा पाऊस’ रॅपला आपला दमदार आवाज दिला आहे. यावेळी दिग्दर्शक रामचंद्र अरुण गांवकर म्हणाले, “‘भूतम भयम्’ हा चित्रपट तरुणाईची मैत्री, त्यांची धमाल आणि त्यांची भन्नाट एनर्जी पडद्यावर घेऊन येतो. ‘पैशाचा पाऊस’ रॅप ही त्याच ऊर्जेची झलक आहे. त्यामुळे हे गाणं थेट विद्यार्थ्यांसमोर लॉन्च करायचं आम्ही ठरवलं. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि त्यांचा जल्लोष पाहून आम्हाला खात्री वाटली की हे गाणं आणि चित्रपट दोन्ही तरुणांच्या मनात घर करतील.”

गायक श्रेयस सागवेकर म्हणाला, “‘पैशाचा पाऊस’ रॅप करताना आम्ही तरुणाईची भाषा, त्यांचा स्वॅग आणि त्यांची एनर्जी गाण्यात आणण्याचा प्रयत्न केला. कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसोबत हे गाणं अनुभवणं खूप खास होतं. त्यांनी दिलेला प्रतिसाद, त्यांनी केलेला डान्स आणि त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून आमच्या मेहनतीचं चीज झाल्यासारखं वाटलं. हा अनुभव कायम लक्षात राहील.”

झी स्टुडिओज प्रस्तुत आणि कायरा कुमार क्रिएशन्स निर्मित ‘भूतम भयम्’ या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन रामचंद्र अरुण गांवकर यांनी केलं आहे. नरेन कुमार आणि महेश ज्ञानदेव कोरडे हे चित्रपटाचे निर्माते असून, बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ता आहेत. चित्रपटात प्रेक्षकांची लाडकी ‘ऑरेंज ज्यूस गँग’ अर्थात करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे, शुभम जाधव, सिद्धांत सरफरे, मनमीत पेम आणि पुष्कराज चिरपुटकर यांची धमाल टीम पाहायला मिळणार आहे. येत्या २४ जुलै रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# माणुसकीला लाभले पंख! जेसीबी ऑपरेटरला आईच्या भेटीसाठी मालकाने विमानाने पाठवले गावी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जीवनशैलीत माणुसकीची नाती जपणारी माणसे अजूनही समाजात आहेत, याचा प्रत्यय निफाड तालुक्यातील सारोळे थडी येथे आला. आपल्या जेसीबी ऑपरेटरच्या अडचणीची जाणीव ठेवत रेणुका माता मजूर संस्थेचे चेअरमन, प्रतिष्ठित शेतकरी व ज्येष्ठ नेते अशोकराव सदाशिव नागरे पाटील यांनी दाखविलेल्या संवेदनशीलतेमुळे परिसरात त्यांच्या दिलदार स्वभावाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बिहार राज्यातील दरभंगा जिल्ह्यातील कन्हैया कुमार राय हे गेल्या सात महिन्यांपासून सारोळे थडी येथे अशोकराव नागरे यांच्या जेसीबीवर ऑपरेटर म्हणून कार्यरत आहेत. कामात प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष असलेल्या कन्हैया यांना काही दिवसांपूर्वी त्यांच्या मातोश्रींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली. आईच्या भेटीसाठी तातडीने गावी जाण्याची गरज निर्माण झाली; मात्र रेल्वेचे आरक्षण उपलब्ध नसल्याने वेळेत पोहोचणे अशक्य झाले होते.

ही बाब समजताच अशोकराव नागरे यांनी कोणताही विलंब न करता पुढाकार घेतला. त्यांनी मुंबई येथून दरभंगा येथे जाणाऱ्या विमानाचे तिकीट स्वतःच्या खर्चाने काढून दिले आणि कन्हैया कुमार राय यांना तातडीने विमानाने गावी रवाना केले. त्यामुळे वेळेत आपल्या आजारी आईजवळ पोहोचणे त्यांना शक्य झाले.

या प्रसंगातून मालक आणि कर्मचारी यांचे नाते केवळ कामापुरते मर्यादित नसून ते विश्वास, आपुलकी आणि माणुसकीच्या बंधनांनी जोडलेले असते, हे अशोकराव नागरे यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या या संवेदनशील निर्णयामुळे केवळ कन्हैया कुमार राय यांनाच दिलासा मिळाला नाही, तर समाजासमोर माणुसकीचा आदर्शही निर्माण झाला.

अशोकराव नागरे यांच्या या हृदयस्पर्शी कृतीबद्दल सारोळे थडी परिसरासह निफाड तालुक्यातून त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, "माणुसकी अजूनही जिवंत आहे," अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. त्यांच्या या कृतीने समाजात संवेदनशीलता, आपुलकी आणि मानवतेचा संदेश अधिक दृढ झाला आहे.

# रामनगर येथे झाड कोसळले; सुदैवाने कोणतीही जीवितहानी हानी

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर, (केतन भोज)**:सतत सुरू असलेल्या पावसामुळे घाटकोपर (पश्चिम) येथील रामनगर अ ट्रान्झिट कॅम्प तसेच साईनाथ पुराण मार्ग तोरणा सोसायटी या परिसरात रविवारी अचानक कोसळल्याच्या घटना घडल्या.यात सुदैवाने दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा कोणाला गंभीर दुखापत झाली नाही.रामनगर हा परिसर मुख्य रहदारीचा मार्ग असल्याने या मार्गावर नेहमीच नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते.झाड कोसळण्याच्या वेळी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.मात्र,सुदैवाने कोणतीही अप्रिय घटना घडली



नाही.घटनेची माहिती मिळताच मनसेचे उपशाखाध्यक्ष दिपक करगुटकर तसेच सामाजिक कार्यकर्ते मंगेश धावडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.तसेच त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभागाला घटनेची माहिती देत झाड हटविण्यासाठी त्वरित कारवाई करण्याची मागणी केली.यानंतर मनपा प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येत झाड हटवण्याचे काम सुरू केले. यामध्ये दिपक करगुटकर तसेच मंगेश धावडे यांनीही सर्व मनपा कर्मचाऱ्यांना मदत करत झाड हटवण्यासाठी सहकार्य केले.

या घटनेमुळे परिसरातील रहदारी व वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धोकादायक स्थितीत असलेल्या झाडांची तातडीने पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी,अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# श्रीवर्धनमध्ये मुसळधार पावसाचा कहर; नद्या दुथडी भरून वाहत, झाडे कोसळल्याने नुकसान

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : हवामान खात्याने रायगड जिल्ह्यासाठी दिलेल्या मुसळधार ते अतिमुसळधार पावसाच्या इशाऱ्यानुसार श्रीवर्धन तालुक्यात सध्या जोरदार पावसाची संततधार सुरू असून जनजीवनावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. शहरासह तालुक्यातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले असून नद्या व नाले दुथडी भरून वाहत आहेत.सततच्या पावसासोबतच वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. काही



ठिकाणी वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला. दरम्यान, एका ठिकाणी नारळाचे झाड थेट घरावर कोसळल्याने घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. संबंधित शासकीय यंत्रणेकडून घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा करण्यात आला आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे नदी-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असून नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे. हवामानाचा अंदाज लक्षात घेता प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, तसेच पाणी साचलेल्या भागांपासून, वेगाने वाहणाऱ्या प्रवाहांपासून आणि धोकादायक झाडांपासून सुरक्षित अंतर राखण्याचे आवाहन केले आहे.पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असल्याने प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले .

# कर्तव्यदक्ष नेतृत्वाचा गौरव : पृथ्वीराज (बापू) जाचक यांचा अहिल्यादेवी जयंती सोहळयात सन्मान

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य सोहळयात सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष मा.श्री.पृथ्वीराज (बापू) जाचक यांचा"कर्तव्यदक्ष नेतृत्व" म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे कारखान्याच्या कार्यपद्धती बरोबरच सहकार क्षेत्रातील त्यांच्या नेतृत्वाचीही व्यापक दखल घेतली गेली.या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री ना.सुनेत्रावहिनी पवार,कृषिमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. हा गौरव सोहळा अहिल्यादेवी विकास प्रतिष्ठान बारामती यांच्या वतीने आयोजित




करण्यात आला.

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून अध्यक्ष पृथ्वीराज (बापू) जाचक यांनी शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत स्वच्छ, पारदर्शक व जबाबदार कारभाराची परंपरा जपली आहे.कारखान्याच्या आर्थिक शिस्तीवर भर कार्यक्षम प्रशासन,वेळेवर निर्णयप्रक्रिया आणि सभासदांचा विश्वास जपणारी कार्यपद्धती यामुळे कारखान्याने सहकार क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.कारखान्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर,उत्पादनक्षमतेत वाढ, सभासद शेतकऱ्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि विकासाभिमुख धोरणे राबविण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने प्रामाणिक,पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.


या गौरवाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर,सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि नागरिकांनी पृथ्वीराज (बापू) जाचक यांचे अभिनंदन करत,हा सन्मान त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाला मिळालेली योग्य पावती असल्याचे मत व्यक्त केले.

# विरेगाव ते कुंभारी पिंपळगाव रस्त्यावरील रांजणी बाजारपेठेतील मुख्य रस्त्याची दुरावस्था; स्थानिक प्रशासनासह बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**घनसावंगी(एकनाथ जाधव) रांजणी** : विरेगाव ते कुंभारी पिंपळगाव या वर्दळीच्या मार्गावरील रांजणी बाजारपेठेतील मुख्य रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. मोठमोठे खड्डे, उखडलेल डांबर आणि पावसामुळे जागोजागी साचलेले पाणी यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.

- बाजारपेठेतील अंदाजे 500 मीटरचा मुख्य रस्ता पूर्णपणे उखडला आहे. ठिकठिकाणी खोल खड्डे पडल्याने दुचाकीस्वार आणि चारचाकी



चालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचून चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. पादचाऱ्यांना चालणेही मुश्कील झाले आहे. आठवडे बाजाराच्या दिवशी वाहतूक कोंडीत भर पडते. रुग्णवाहिकेलाही मार्ग काढणे कठीण होते.स्थानिक व्यापारी आणि ग्रामस्थांनी सांगितले की, गेल्या सहा महिन्यांपासून रस्त्याची हीच अवस्था आहे. अनेकदा तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग व स्थानिक प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे.खड्ड्यांमुळे ग्राहक बाजारात येणे टाळतात. आमच्या व्यवसायावर परिणाम होतोय. शिवाय लहान-मोठे अपघात रोजचेच झाले आह.“मुलांना शाळेत पाठवताना जीव मुठीत धरून राहावे लागते. रस्ता दुरुस्त करा, अन्यथा आंदोलन करू,” असा इशारा नागरिकांनी दिला आहे.या रस्त्याच्या देखभालीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. मात्र, निधीअभावी किंवा ठेकेदाराच्या मनमानीमुळे काम रखडल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. स्थानिक ग्रामपंचायतीनेही पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही झालेली नाही.रांजणी व परिसरातील नागरिकांनी तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे. पावसाळ्यापूर्वी काम न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# विकासाच्या नादात दादर मध्ये निसर्गा कडे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**मुंबई दादर प्रतिनिधी मयुर धुरी** : मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्क परिसरात मुसळधार पावसामुळे अनेक छोटी मोठे झाडे अचानक कोसळल्याची घटना घडली. एक झाड तर थेट रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका कारवर पडल्याने वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी



झाल्याची माहिती समोर आलेली नाही. मात्र, कारचा पुढील भाग आणि काचा पूर्णपणे चक्काचूरझाल्या आहेत. तसेच सतत येणाऱ्या पावसामुळे मैदानातील लाल माती सुद्धा मोठ्या प्रमाणात रस्तावर वाहून आली काही स्थानिक लोकांच्या मते सुशोभी करण्याच्या नादात झाडांच्या न घेतलेल्या काळजी मुळे या घटना घडत आहेत.घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे कर्मचारी आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून झाड हटवण्याचे काम सुरू आहे.

# कोट्यवधींचा नालेसफाईचा खर्च गेला कुठे?" जलमय पनवेलने पनवेल महानगरपालिकेच्या कारभारावर उभे केले गंभीर प्रश्न

**दैनिक युवक आधार**

**नवी पनवेल, प्रतिनिधी दिपक कोळवणकर** : नवीन पनवेल सेक्टर 13 मधील कालीमाता मंदिर ते अभ्युदय बँक या संपूर्ण परिसरात झालेल्या मुसळधार पावसानंतर रस्ते अक्षरशः जलमय झाले. रस्त्यावर कंबरेएवढे नसले तरी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली, अनेक वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागला, तर काही ठिकाणी नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरून लाखो रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, गटार सफाई आणि पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत ठेवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याचा दावा पनवेल महानगरपालिका करते. मात्र पहिल्याच जोरदार पावसात शहरातील प्रमुख रस्ते आणि निवासी परिसर पाण्याखाली जात असतील, तर हा खर्च नेमका कुठे झाला? नागरिकांना प्रत्यक्षात त्याचा लाभ का मिळाला नाही? असे संतप्त प्रश्न आता सर्वसामान्य पनवेलकर विचारू लागले आहेत.

कालीमाता मंदिर ते अभ्युदय बँक हा परिसर पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने फर्निचर, फ्रिज, वॉशिंग मशीन, इलेक्ट्रॉनिक वस्तू, महत्त्वाची कागदपत्रे तसेच घरगुती साहित्याचे नुकसान झाले. व्यापाऱ्यांनाही आर्थिक फटका बसला असून अनेकांना आपल्या व्यवसायाचे कामकाज बंद ठेवावे लागले.




या परिस्थितीचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, दिव्यांग, रुग्ण आणि कामगार वर्गाला बसत आहे. रस्त्यावर साचलेल्या पाण्यात उघडी गटारे, मॅनहोल किंवा खड्डे असल्यास अपघाताचा धोका निर्माण होतो. याशिवाय डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पायरोसिससारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

## ■ कालीमाता मंदिर ते अभ्युदय बँक मार्ग पाण्याखाली
## ■ घरांमध्ये पाणी शिरून नागरिकांचे मोठे नुकसान, प्रशासनाविरोधात संताप

नागरिकांचा रोष केवळ पावसावर नाही, तर नियोजनशून्य प्रशासनावर आहे. जर नालेसफाई वेळेत आणि प्रभावीपणे झाली असती, पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची यंत्रणा सक्षम असती, तर अशी परिस्थिती निर्माण झाली नसती, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

पनवेलकरांचा प्रश्न आता थेट आहे—कर वेळेवर भरायचा आम्ही, नुकसान सहन करायचे आम्ही, आणि जबाबदारी स्वीकारायची मात्र कोणीच नाही का?

नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेकडे पुढील मागण्या केल्या आहेत:

जलमय झालेल्या भागातील तातडीने पाण्याचा निचरा करावा.

नालेसफाईच्या कामांची स्वतंत्र चौकशी करून जबाबदार अधिकारी आणि संबंधित ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करावी.

घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झालेल्या नागरिकांचे पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत द्यावी.

भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी कायमस्वरूपी जलनिस्सारण आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

विकासाच्या मोठमोठ्या घोषणा, कोट्यवधी रुपयांची कामे आणि प्रत्यक्षात पहिल्याच मुसळधार पावसात जलमय होणारे शहर — ही परिस्थिती पनवेल महानगरपालिकेच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह उभी करते. नागरिकांना आश्वासनांची नव्हे, तर सुरक्षित आणि सक्षम नागरी सुविधांची गरज आहे.

---

# मुख्याध्यापक नामदेवराव साखळे यांचा गोळेगाव येथे गौरव सोहळा

## ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सामाजिक कार्य अन् आधुनिक शेतीचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : केवळ नोकरी, कुटुंब आणि संसार न पाहता समाजाचेही काही देणे लागते, या भूमिकेतून नोकरी करत असतानाच सामाजिक क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या निवृत्त मुख्याध्यापक नामदेवराव साखळे यांचे काम आदर्श घेण्याजोगे आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे प्रदेश चिटणीस सुरेश बनकर यांनी गोळेगाव (ता. सिल्लोड) येथे बोलताना केले.

गोळेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक नामदेवराव साखळे हे ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने गोळेगाव येथील ग्रामपंचायत, शालेय शिक्षण समिती, माजी विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने गौरवशाली, निस्वार्थ व प्रेरणादायी सेवा पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाजपाचे प्रदेश चिटणीस सुरेश बनकर होते, तर माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, पंचायत समिती सभापती सौ. अनिताताई बनकर,




सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामदास हिवाळे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन वाघ, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश बनकर, प्रा. संजय कळात्रे, गोळेगावचे सरपंच गणेश बनकर, चेअरमन अशोक साखळे व प्रा. शिवराम साखळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या वेळी माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, रामदास हिवाळे, अशोक पाटील साखळे आणि डॉ. सचिन वाघ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सांडू पाटील लोखंडे म्हणाले की, नामदेवराव साखळे हे केवळ शिक्षक नव्हते, तर विविध क्षेत्रांत त्यांचे उल्लेखनीय कार्य राहिले आहे. शिक्षक परिषदेचे काम करताना त्यांनी शिक्षकांच्या अनेक प्रश्नांसाठी लढा दिला. तसेच, नोकरीच्या मागे न लागता आधुनिक पद्धतीने शेती करून त्यांनी एक प्रगतशील शेतकरी म्हणून परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

कार्यक्रमास माजी उपसरपंच संतोष पाटील साखळे, मुख्याध्यापक दिलीप साखळे, भाजपचे भवन मंडळ उपाध्यक्ष हरीदास साखळे, विनोद चव्हाण, मुरलीधर डापके, राजु डापके, उत्तम बावस्कर, गणेश बावस्कर, विष्णु फरकाडे, गणपत सरोदे, भाजपचे पदाधिकारी, गावकरी, शिक्षक-शिक्षिका आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# नवीन पनवेल सेक्टर १३ मध्ये पावसामुळे घरांमध्ये पाणी

## महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापनावर नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नवीन पनवेल येथील सेक्टर १३ मधील काही घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. अनेक ठिकाणी पाणी साचल्याने दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दत्त मंदिर परिसर तसेच सेक्टर १३ मधील महापालिकेचे पाणी उपसणारे पंप बंद अवस्थेत असल्याने साचलेल्या पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. केवळ काली माता मंदिर परिसरातील एकच पंप सुरू असल्याने संपूर्ण परिसरातील पाण्याचा निचरा करण्यासाठी तो अपुरा ठरत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. या घटनेमुळे महापालिकेच्या आपत्ती



व्यवस्थापनाच्या तयारीवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पावसाळ्यापूर्वी गटारी आणि पावसाच्या पाण्याच्या नाल्यांची योग्य प्रकारे साफसफाई करण्यात आली होती का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण पनवेल शहराला अक्षरशः झोडपून काढले. नवीन पनवेलही या पावसाच्या तडाख्यातून सुटू शकले नाही. सकाळपासूनच पावसाचा जोर कायम असल्याने अनेक नागरिकांमध्ये सन २००५ मधील महापुराची पुनरावृत्ती होते की काय, अशी भीती निर्माण झाली होती.

दुपारी बाराच्या सुमारास पावसाचा जोर आणखी वाढत गेला. त्यानंतर अभ्युदय बँकेपासून कालीमाता मंदिरापर्यंतचा संपूर्ण रस्ता पाण्याखाली गेला. सेक्टर-१३, ए-टाइप येथे राहणाऱ्या नागरिकांच्या मते, पाण्याची पातळी सातत्याने वाढत होती आणि ती त्यांच्या घराच्या पहिल्या पायरीपर्यंत येऊन पोहोचली होती.

दरम्यान, प्रशासनाने कालीमाता मंदिरासमोर तसेच परिसरातील पाणी उपसण्यासाठी दोन पंप आधीच उपलब्ध करून ठेवले होते. मात्र, सुरुवातीला हे पंप सुरूच होत नव्हते. त्यानंतर सुरू झाल्यानंतरही ते प्रभावीपणे पाणी उपसत नसल्याने परिसरात पाणी साचत राहिले आणि नागरिकांची चिंता वाढली.

त्यानंतर आवश्यक दुरुस्ती व उपाययोजना करण्यात आल्यानंतर दुपारी १ वाजेच्या सुमारास पाण्याचा निचरा होण्यास सुरुवात झाली. परिणामी, हळूहळू रस्त्यावर साचलेले पाणी ओसरले आणि वाहतूक पूर्ववत होऊ लागली. नागरिकांनी तातडीने बंद पंप सुरू करून पाणी साचलेल्या भागाचा निचरा करावा, तसेच गटार आणि जलनिस्सारण व्यवस्थेची प्रभावी देखभाल करून भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

---

# ट्रेलरखाली आल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल–मुंब्रा महामार्गावरील तळोजा येथील पेंधर उड्डाण पुलाखाली दुचाकी घसरून पडलेल्या दुचाकीस्वाराच्या अंगावरून भरधाव ट्रेलर गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. दिनेश शिंदे (४२) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव असून, ते पनवेल येथील आदई गावात राहत होते.

दिनेश शिंदे हे दुचाकीने तळोजा येथून पनवेलकडे जात होते. पनवेल–मुंब्रा महामार्गावरील पेंधर उड्डाणपुलाखाली आल्यानंतर त्यांच्या मोटारसायकलचा अचानक ताबा सुटून ती घसरली. त्यामुळे ते रस्त्यावर कोसळले. याचवेळी मागून येणाऱ्या भरधाव ट्रेलरचे चाक त्यांच्या अंगावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघात इतका भीषण होता की, त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच तळोजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

या प्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

---

# दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (राजरत्न आंबेडकर ) भंडारा जिल्हा शाखेची सभा विश्राम गृह भंडारा येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा विशेष प्रतिनिधी** -दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया भंडारा जिल्हा शाखेची सभा विश्रामगृह भंडारा येथे ४ जुलै 2026 ला दुपारी१२ वाजता आयोजित करण्यात आली होती. या सभेत बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया जिल्हा शाखेचा विस्तार करून टीबीएसआय व एएम एससी चे कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय बनसोड अध्यक्ष नागपूर विभाग होते. तर मार्गदर्शक म्हणून बुधाजी




वाढविंदे राज्याध्यक्ष, हेमंत जाधव राज्य महासचिव, नरेंद्र चहांदे राज्य कार्यक्रम समन्वयक ,आकाश चौरे विभागीय मुख्य संघटक उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी भारतीय बौद्ध महासभा चे विस्तार तसेच बँकेचे शेअर कसे घ्यावे व का घ्यावे याबद्दल छान माहिती दिली व येणाऱ्या डिसेंबर 2026 पर्यंत भंडारा जिल्ह्यात एक बँक शाखा स्थापन करण्यात यावी असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. प्रवीण थुलकर जिल्हाध्यक्ष, तथागत फुले तालुका महासचिव यांनी केले होते.

कार्यक्रमाचे संचालन जिल्हा महासचिव मनोज बनसोड यांनी केले. तर आभार महिला उपाध्यक्ष शालुताई तिरपुडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरता इंजिनीयर रूपचंद रामटेके, सुदेश वैद्य ,राजविलास गजभिये, दीपक जनबंधू, सतीशकुमार नागदेवे, पत्रकार संजीव भांबोरे ,आम्रपाली गजभिये ,विजय नंदागवळी, केवल नागदेवे, सुदर्शन ताई वैद्य, छायाताई नंदा गवळी ,राजेश मडामे, उमेश मेश्राम ,डॉ सुनील जीवनतारे तसेच तुमसर, साकोली येथील बौद्ध उपासक-उपासिका व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# क–हेवडगांवच्या शिरपेचात मानाचा तुरा; गावची लेक गितांजली विधाते बनली औषधनिर्माण अधिकारी गावातून पहिल्यांदाच मेडीकल क्षेत्रात अधिकारी बनण्याचा पटकवला मान

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे** : तालुक्यातील क-हेवडगांव येथील कु.गितांजली सुरेखा राजाराम विधाते हिने अपार जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर शून्यातून विश्व निर्माण करता येते अशक्य काहीच नाही,हे सिद्ध करून दाखवले आहे. मेडीकल क्षेत्रात पाऊल टाकल्यानंतर परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी बनणे हे अनेक विद्यार्थांचे स्वप्न असते. मात्र हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रचंड मेहनत, शिस्त आणि सातत्य आवश्यक असते. अशाच जिद्दीच्या बळावर गितांजली ने औषधनिर्माण अधिकारी (Pharmacy Officer) पदासाठी यश संपादन केले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.क-हेवडगांवच्या शिरपेचात गावच्या लेकीन मानाचा तुरा रोवला असून गावातून पहिलीच अधिकारी बनण्याचा मान पटकावला आहे.तालुक्यातील क-हेवडगांव सारख्या ग्रामीण भागात जि.प.शाळेत शिक्षण घेऊन गितांजली ने सुविधांचा अभाव असताना शिक्षण घेतले लहानपणापासूनच ती अभ्यासात अत्यंत हुशार होती.१ ते ३ शिक्षण क-हेवडगांवच्या जि.प.शाळेत झाले ५ वी ते १० पंडीत नेहरू विद्यालय आष्टी,११ वी १२ लातुर येथे शिक्षण घेऊन प्रवरालोणी येथील विठ्ठलराव विखे कॉलेज ऑफ फार्मसी येथे बी फार्मसी तर एम फार्मसी विळद घाट अहिल्यानगर येथे पूर्ण करुन स्पर्धा परिक्षेची तयारी करत होती. तब्बल ८ वर्ष बाहेर राहून अभ्यासात सातत्य ठेवून अभ्यास करत राहिली तिला सातत्यपूर्ण मेहनतीमुळे आणि शैक्षणिक प्रगतीमुळे स्पर्धा परीक्षेकडे वळण्याची प्रेरणा मिळाली परिक्षेची तयारी करताना शिस्तबद्ध अभ्यास



आणि योग्य नियोजन यावर गितांजली ने भर दिला औषधनिर्माण अधिकारी (Pharmacy Officer/ Pharmacist) पदासाठी यश संपादन केले हे यश म्हणजे तिच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि चिकाटीचे फलित आहे. यशातून हे स्पष्ट होते की योग्य रणनीती आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी कोणतेही मोठे ध्येय साध्य करता येते.मेडीकल क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना

**विद्यार्थ्यांनी स्वत:च्या आवडी आणि समज लक्षात घेऊन विषय निवडावा**

**विद्यार्थ्यांनी स्वत:च्या आवडी आणि समज लक्षात घेऊन विषय निवडला पाहिजे अभ्यासासाठी वेळेचे योग्य नियोजन करून पूर्ण अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे आणि पुनरावलोकनासाठी (revision) पुरेसा वेळ ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जिद्द, मेहनत आणि योग्य दिशा मिळाल्यास यश निश्चितच मिळते**

**- कु.गितांजली राजाराम विधाते**
**( नवनिर्वाचित औषधनिर्माण अधिकारी )**

गितांजली विधाते ची यशोगाथा ही लाखो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.तिच्या या यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तिच्या पुढील शासकीय सेवेसाठी उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# दहा केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत मंगळवारी माजी आ. भीमराव धोंडे हे दिल्लीत महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित होणार

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे :** आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी गेल्या ४५ वर्षात मतदारसंघात शैक्षणिक, कृषी, सामाजिक, क्रिडा, राजकीय, धार्मिक कार्य करुन जिल्हा व राज्याच्या विकासात भर घातली त्याबद्दल दिल्लीत केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी, केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान, केंद्रीय पेट्रोलीयम मंत्री हरदिपसिंग पुरी,भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया, दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता,सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. श्रीमती अनुप्रिया पटेल,केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रतापराव जाधव, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा केंद्रीय राज्यमंत्री ना. श्रीपाद नाईक, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री ना.



मुरलीधर मोहोळ,माजी वस्त्रोद्योग कॅबिनेट मंत्री श्रीमती स्मृती इराणी, दिल्ली विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता, भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा.डॉ. सुधांशू त्रिवेदी इत्यादी केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत नवभारत मिडिया ग्रुपच्या वतीने दिल्या जाणाऱ्या महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित होणार आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की,माजी आ. भीमराव धोंडे यांनी गेल्या ४० ते ४५ वर्षात केलेल्या राजकीय, कृषी, शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत नवभारत मिडीया ग्रुपने त्यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड केली आहे.

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्याच्या ( मराठवाडा ) आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव आनंदराव धोंडे यांचा जन्म ५ ऑगस्ट १९५५ रोजी आष्टी तालुक्यातील रुईनालकोल या खेड्यात शेतकरी कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षण गावातच झाले. दररोज आठ किलोमीटर पायी जाऊन कडा येथे माध्यमिक व अहिल्या नगर येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. शिक्षण घेतानाच त्यांना राजकारणाची आवड निर्माण झाली. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून युवकांचे संघटन करीत १९८० साली विधानसभा लढवली आणि अगदी कमी वयात ते आमदार झाले, सलग पंधरा वर्षे त्यांनी विधानसभा गाजवली. पुन्हा वीस वर्षांच्या खंडानंतर २०१४ साली विधानसभा निवडणुकीत भाजपाकडून विजयी झाले. वीस वर्षांच्या खंडानंतर पुन्हा विधानसभा निवडणुकीत विजयी होणारे भीमराव धोंडे हे एकमेव आमदार आहेत. बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा हा कायमस्वरूपी दुष्काळी भाग, त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी या भागातील मोठ्या प्रमाणात लोकांचे स्थलांतर होते. गोरगरीब कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी त्यांनी सुरूवातीला विधानसभा सदस्य झाल्यानंतर शैक्षणिक संस्था सुरू केली त्यामाध्यमातून एक दोन गावांमध्ये शाळा सुरू केल्या. हळूहळू मतदारसंघातील अनेक गावांमध्ये शाळा महाविद्यालये व इतर शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करून शिक्षणाची गंगा मतदारसंघात आणली. त्यापुर्वी अ. नगर, संभाजीनगर, पुणे येथे उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या गोरगरिब कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांना आपल्या भागातच सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत त्यामुळे या भागाची खरोखरच शैक्षणिक क्रांती झाली आहे. पंधरा ते वीस वर्षात गावागावात शाळा सुरू केल्या. प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय तसेच वैद्यकीय कृषी,नर्सिंग, पॅरामेडिकल, इंजिनिअरिंग, फुड टेक्नॉलॉजी, पशुवैद्यकीय असे वेगवेगळे ५० पेक्षा जास्त युनिट सुरू आहेत, यामध्ये ४० हजारांहून जादा विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सुरुवातीला पंधरा वर्षे आणि नंतरचे पाच वर्ष, या २० वर्षात त्यांनी गावागावात पाझर तलाव, रस्ते,विज अशा सुविधा उपलब्ध करीत या भागाचा कायापालट केला. २०१४ मध्ये विधानसभा सदस्य झाल्यानंतर मतदारसंघातील अनेक रस्त्यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून चकाचक रस्ते बवनले आहेत. त्यामुळे ते रस्ते महर्षी म्हणून लोकांच्या चर्चेत आले. शिक्षण महर्षी, रस्ते महर्षी, विकास महर्षी अशी अनेक बिरुदे त्यांच्या नावापुढे लागली. माजी आ. भीमराव धोंडे यांनी शेतकऱ्यांसाठी आष्टी ते बीड, आष्टी ते मुंबई आणि आष्टी ते दिल्लीपर्यंत हजारो शेतकऱ्यांसह पायी मोर्चे काढलेले आहेत. त्याचप्रमाणे आज त्यांच्या शिक्षण संस्थेत सुमारे दोन हजार शिक्षक व इतर कर्मचारी कार्यरत आहेत. आपल्या परिसरातील गोरगरीबांच्या मुला मुलींना आपल्याच भागात वैद्यकीय शिक्षण मिळावे यासाठी वैद्यकीय व फार्मसी महाविद्यालये सुरू केली आहेत. दिवसेंदिवस कॅन्सरचे रुग्ण वाढत आहेत, अशा रुग्णांना ग्रामीण भागात कमी खर्चात उपचार मिळावेत याकरिता मराठवाड्यातील सर्वात मोठ्या ५०० बेडच्या कॅन्सर हॉस्पिटलचे काम प्रगतीपथावर आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला महेश सहकारी साखर कारखाना येत्या गळीत हंगामापासून सुरू होत आहे. शैक्षणिक संस्था व कारखान्याच्या माध्यमातून बेरोजगारांचा रोजी रोटीचा प्रश्न मार्गी लागला आहे.

भविष्यात आष्टी सारख्या दुष्काळी भागात कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा माजी आमदार भीमराव धोंडे यांचा मानस आहे. सुरुवातीला आमदार झाल्यानंतर शेतकऱ्यांसाठी सहकारी तत्वावर दुध संघ व कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे सुरू केली आज दोन्ही संस्था चांगल्या प्रगतीपथावर आहेत.

महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच त्यांना खेळाची खुप आवड होती. कुस्ती आणि कबड्डी खेळाडू म्हणून त्यांनी राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक केले. आजही ते खेळाडूंना आर्थिक मदत देऊन प्रोत्साहन देतात. महाराष्ट्र केसरी सईद चाऊस हा आष्टीच्या तालमीतील पठ्ठा आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य करताना त्यांच्या सौभाग्यवती दमयंतीताई धोंडे यांची मोलाची साथ लाभली. मतदारसंघाचा विकास आणि मतदारांचा विश्र्वास म्हणजेच शिक्षण महर्षी, शेतकऱ्यांचे नेते, विकास पुरुष, रस्ते महर्षी, शिक्षण सम्राट माजी आमदार भीमराव धोंडे साहेब !

## चांदवड–लासलगाव मार्गावर ३२ किलो गांजा जप्त; एलसीबीची धडक कारवाई, तिघे जेरबंद – १४.७४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : नाशिक ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत चांदवड-लासलगाव मार्गावरील दिघवद शिवारातून तब्बल ३२ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत सिन्नर तालुक्यातील तिघा संशयितांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून गांजा, कार, मोबाईल फोन व रोख रक्कम असा १४ लाख ७४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक (मालेगाव) तसेच अपर पोलीस अधीक्षक (नाशिक ग्रामीण) यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंदे आणि अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत ४ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चांदवड परिसरात गस्त घालत असताना, चांदवडकडून लासलगावच्या दिशेने जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कारमधून गांजाची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी चांदवड-लासलगाव मार्गावरील दिघवद शिवारात सापळा रचून संशयित कार अडवली. पंचांसमक्ष वाहनाची झडती घेतली असता, कारच्या डिकीत प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये ठेवलेला ३२ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ कारमधील तिघांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये संदीप रामनाथ सानप (वय ३६), अनिल केशव बोडके (वय ३०) आणि यश संदीप मोरे (वय २४), सर्व रा. सिन्नर, जि. नाशिक यांचा समावेश आहे.

या प्रकरणी चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७६/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा कलम ८(क), २०(ब)(ii)(क) व २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडून ३२ किलो गांजा, स्विफ्ट डिझायर (एमएच-०१-बीटी-८८१३), मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १४ लाख ७४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास चांदवड पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत असून, जिल्ह्यात अंमली पदार्थांची तस्करी व विक्री रोखण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस दलाकडून यापुढेही अशाच धडक कारवाया सुरू राहतील, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत विवेकानंद विद्यालयाची यशस्वी भरारी

**दैनिक युवक आधार**
**सेलू/प्रतिनिधी शिवाजी पवार** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे.

या परीक्षेत इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत धनंजय चौधरी 244 गुण (जिल्ह्यात 12 वा ), मधुर कुलकर्णी 232 गुण ( जिल्ह्यात 21 वा ), काव्या मरेवार 222 गुण (जिल्ह्यात 41 वी ), श्रेयस मुपडे 210 गुण (जिल्ह्यात 75 वा ), शुभ्रा मुळी 202 गुण (जिल्ह्यात 98 वी ) शिष्यवृत्ती धारक झाले आहेत तसेच इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत समर्थ पवार 214 गुण (जिल्ह्यात 84 वा ) शिष्यवृत्ती धारक झाला आहे.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना रागिणी जकाते, काशिनाथ पांचाळ, चंद्रकांत कव्हळे यांचे मार्गदर्शन मिळाले तर आठवी शिष्यवृत्तीसाठी विनोद मंडलिक, विजय चौधरी, शंकर राऊत, अनिकेत भिलेगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



यशस्वी विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन तसेच पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमांचे हे यश असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्षा ज्योतीताई ठाकूर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे, संस्था प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे स्थानिक समितीचे अध्यक्ष हरिभाऊ चौधरी, स्थानिक कार्यवाह उपेंद्र बेल्लूरकर, शालेय समिती अध्यक्षा करुणा कुलकर्णी,मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सुरगाणा महाविद्यालयात वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर नाशिक संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणमहर्षी लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या ४६ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य डॉ. दिघावकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे,



शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. सुरेश भोये, आय. क्यू. एस्सी समन्वयक डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ. रविंद्र हिरे, डॉ.गुलाब पवार, प्रा.कविता भोये , प्रा.भगवान महाले, डॉ. विनायक बागुल, क्रीडा संचालक डॉ. संतोष पवार , नाना कोर,सुमित, ओमकार धुम, हेमंत चौधरी यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक तथा प्राचार्यपदी सय्यद ए. डी तर उपमुख्याध्यापकपदी गवळी बी. आर

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे** : तालुक्यातील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धानोरा येथील मुख्याध्यापक तथा प्राचार्यपदी श्री. सय्यद ए. डी. यांची तर उपमुख्याध्यापकपदी श्री. गवळी आर बी यांची नियुक्ती झाल्याबद्दल विद्यालयाचा स्टाफ, मित्र परिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जीवन क्लिनिकचे डॉ. रज्जाक सय्यद, रा. प. महामंडळाचे वाहक कैलास (भाऊ) मोरे, ज्येष्ठ पत्रकार प्रा. निसार शेख, माजी सभापती अंकुशराव चव्हाण, माजी सरपंच राजाभाऊ शेळके, ह भ प परमेश्वर गायकवाड महाराज, आजिनाथ राव शेळके पाटील डॉक्टर वैभव तोडकर, इर्शादभाई शेख,

संदीप झांजे सर, नितीन मोरे, सर होळकर सर, गायकवाड सर, एस आर गव्हाणे सर, एस. पी . अडागळे सर, एकशिंगे सर, निजाम पठान सर, घोडेस्वार सिताराम सर व विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच मित्र परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार समारंभात उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त मुख्याध्यापक श्री. सय्यद आणि उपमुख्याध्यापक श्री. गवळी यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.



शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य देत विद्यालयाची उज्ज्वल परंपरा अधिक बळकट करण्यासाठी त्यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

मुख्याध्यापक श्री. सय्यद यांनी सत्काराबद्दल उपस्थित सर्वांचे आभार मानत शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि व्यवस्थापन यांच्या सहकार्याने विद्यालयाच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपमुख्याध्यापक श्री. गवळी यांनीही विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, शैक्षणिक उपक्रम आणि गुणवत्तावृद्धीसाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

छोटेखानी कार्यक्रम आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी नवनियुक्त मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत विद्यालय शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात अधिक प्रगती करेल, असा विश्वास व्यक्त केला.

## ऐन पावसाळयात जाफराबाद तालुक्यात दुहेरी संकट १२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू – शासकिय टँकरची मुदत संपली

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद / टेंभुर्णी प्रतिनिधी:- अनिल ससाने** : जाफराबाद तालुक्यातील काही भागात खरीप हंगामा सुरु होऊन एक महिना उलटला असून पावसाने दडी मारली आहे त्यामुळे जाफराबाद तालुक्यामध्ये दुहेरी संकट निर्माण झाले आहे एकीकडे काही पेरण्या रखडल्या असून दुसरीकडे पिण्याचे पाण्याचे तीव्र टंचाई निर्माण झाली आहे पाणी टंचाई उपाय म्हणून सुरू केलेले शासकीय टँकर व



काही गावात विहीर अधिग्रहण केलेले होते त्याची मुदत१ जुलै रोजी संपल्याने ते बंद करण्यात आले असून अद्यापही तालुक्यातील१२ गावे खाजगी टँकरवर अवलंबून आहे व जाफराबाद तालुक्यांमध्ये काही गावामध्ये विहीर अधिग्रहाचे प्रस्ताव संबंधित गावातील ग्रामसेवक यांनी पंचायत समिती येथे संबंधित कार्यालयामध्ये अगोदरच प्रस्ताव दिलेले होते

परंतु त्यांनी काही कारणास्तव ते प्रस्ताव एक महिना लेट केले होते आता प्रश्न असा निर्माण होतो की त्या एका महिन्याची विहीर अधिग्रणांचे पैसे कोण देणार असा प्रश्न उपस्थित होत आहे जाफराबाद तालुक्यातील सात गावांमध्ये सध्या खाजगी टँकर रोज सुमारे 25 फेऱ्या करून पाणीपुरवठा केला जात आहे तालुक्यातील सहा महसूल मंडळापैकी काही भागात किरकोळ पाऊस झाला असला तरी अनेक मंडळात पावसाने पाठ फिरवली आहे त्यामुळे जुलैचा पहिला आठवडा संपला तरी पाऊस न झाल्याने काही गावाच्या पेरण्या रखडले आहेत त्यामुळे जाफराबाद तालुक्यातील जनता दमदार पावसाची प्रतीक्षा करीत आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पक्षांतराचे राजकारण की संविधानाचा पराभव?

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्ष हे केवळ निवडणुका लढविण्याचे माध्यम नसून ते जनतेच्या विचारांचे, आशा-आकांक्षांचे आणि लोकप्रतिनिधित्वाचे प्रमुख व्यासपीठ असतात. मतदार एखाद्या उमेदवाराला मतदान करताना त्याच्या वैयक्तिक प्रतिमेसोबतच त्याच्या पक्षाच्या विचारधारेवर आणि धोरणांवरही विश्वास व्यक्त करत असतो. त्यामुळे निवडून आल्यानंतर वैयक्तिक स्वार्थ, सत्तेची लालसा किंवा राजकीय लाभासाठी पक्ष बदलणे ही केवळ नैतिकतेची बाब नसून लोकशाहीतील जनादेशाशी प्रतारणा मानली जाते. याच पार्श्वभूमीवर भारतीय संविधानात दहाव्या अनुसूचीद्वारे पक्षांतरबंदी कायद्याची तरतूद करण्यात आली.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर पुन्हा एकदा पक्षांतरबंदी कायदा, संविधानातील दहावी अनुसूची आणि लोकसभा सदस्यांच्या अपात्रतेचा प्रश्न राष्ट्रीय चर्चेचा विषय ठरला आहे. ठाकरे गटाने या सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावत त्यांच्याविरुद्ध अपात्रतेची प्रक्रिया सुरू केली आहे. या घडामोडींमुळे संविधानातील तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि लोकसभा अध्यक्षांची भूमिका पुन्हा एकदा केंद्रस्थानी आली आहे.

भारतीय संविधानात १९८५ मध्ये ५२ व्या घटनादुरुस्तीद्वारे दहाव्या अनुसूचीचा समावेश करण्यात आला. त्यामागील उद्देश स्पष्ट होता—लोकप्रतिनिधींनी वैयक्तिक लाभासाठी किंवा सत्तेच्या मोहापोटी पक्षांतर करून लोकशाही अस्थिर करू नये. संविधानाच्या दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद २(१) (अ) नुसार, एखादा सदस्य स्वेच्छेने आपल्या राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडतो किंवा पक्षाच्या आदेशाविरुद्ध वर्तन करतो, तर त्याला अपात्र घोषित करता येते. येथे "स्वेच्छेने पक्ष सोडणे" याचा अर्थ केवळ लेखी राजीनामा देणे एवढाच मर्यादित नसून, प्रत्यक्ष कृती, सार्वजनिक भूमिका आणि दुसऱ्या पक्षाशी उघड निष्ठा दाखविणे हेदेखील त्यात समाविष्ट होते.

ठाकरे गटाच्या बैठकीला अनुपस्थित राहणे, पक्षादेशाचे पालन न करणे आणि त्यानंतर प्रत्यक्ष दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे या घटनांचा विचार करता संबंधित खासदारांचे वर्तन हे संविधानाच्या दहाव्या अनुसूचीतील तरतुदींशी विसंगत असल्याचा दावा ठाकरे गटाने केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी घटनात्मकदृष्ट्या विचार करण्याजोगी आहे.

मात्र या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विलीनीकरण (Merger). अनेकदा दोन-तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा मिळाला म्हणजे अपात्रता टळते, अशी चुकीची समजूत केली जाते. प्रत्यक्षात संविधान (९१ वी घटनादुरुस्ती), २००३ नंतर केवळ विधानमंडळ पक्षातील दोन-तृतीयांश सदस्यांचे बहुमत पुरेसे नसते. मूळ राजकीय पक्षाचे दुसऱ्या पक्षात विधिवत विलीनीकरण होणे आवश्यक असते. त्यानंतरच विधानमंडळ पक्षाला त्या विलीनीकरणास संमती देण्याचा प्रश्न निर्माण होतो.

याच मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने २०२३ मध्ये एकनाथ शिंदे विरुद्ध उद्धव ठाकरे प्रकरणात महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली होती. न्यायालयाने स्पष्ट केले की, विधानमंडळ पक्षापेक्षा मूळ राजकीय पक्ष अधिक महत्त्वाचा आहे. विधानमंडळ पक्ष हा तात्पुरता असतो, तर मूळ राजकीय पक्ष ही कायमस्वरूपी संघटनात्मक रचना असते. पक्षाचा प्रतोद, पक्षनेता आणि संघटनात्मक नियंत्रण हे मूळ पक्षाकडे असते. त्यामुळे केवळ विधानमंडळ पक्षातील बहुमताच्या आधारे मूळ पक्ष बदलता येत नाही.

सध्याच्या प्रकरणात उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या मूळ संघटनेत कोणतीही उभी फूट पडलेली नाही किंवा त्या पक्षाचे अधिकृतपणे दुसऱ्या पक्षात विलीनीकरण झालेले नाही. त्यामुळे सहा खासदारांकडे दोन-तृतीयांश बहुमत असले तरी संविधानाच्या दृष्टीने त्यांना विलीनीकरणाचा अपवाद लागू होईलच, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावरील अपात्रतेची शक्यता कायम आहे.

या संपूर्ण प्रकरणात लोकसभा अध्यक्षांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरणार आहे. संविधानानुसार अपात्रतेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्षांकडे असला तरी तो अधिकार पूर्णपणे अमर्यादित नाही. तो संविधान, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या अधीन आहे. अध्यक्षांनी कोणताही राजकीय पूर्वग्रह न ठेवता, निःपक्षपातीपणे आणि पारदर्शकतेने निर्णय देणे ही लोकशाहीची अपेक्षा आहे.

मात्र भारतीय लोकशाहीसमोरील खरी समस्या केवळ पक्षांतराची नाही, तर निर्णय प्रक्रियेतील विलंबाची आहे. अनेकदा अपात्रतेच्या याचिका महिनोनमहिने किंवा वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. तोपर्यंत संबंधित सदस्य आपला कार्यकाळ पूर्ण करतात, मंत्री होतात किंवा सत्तेतील महत्त्वाची पदेही भूषवितात. अशा परिस्थितीत पक्षांतरबंदी कायद्याचा मूळ उद्देशच निष्प्रभ ठरतो.

सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणांत अध्यक्षांनी वाजवी कालावधीत निर्णय द्यावा, असे स्पष्ट केले असले तरी प्रत्यक्षात त्यासाठी कोणतीही निश्चित घटनात्मक किंवा वैधानिक कालमर्यादा नाही. त्यामुळे निर्णय प्रक्रियेचा विलंब अनेकदा राजकीय फायद्यासाठी वापरला जातो. न्याय मिळण्यास होणारा विलंब हा न्याय नाकारल्यासारखाच असल्याची उक्ती येथे तंतोतंत लागू पडते.

आज पक्षांतराचे राजकारण हे केवळ वैयक्तिक निष्ठा बदलण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. लोकांनी दिलेला जनादेश, पक्षनिष्ठा, विचारधारा आणि संविधानिक मूल्ये यांनाही त्याचा फटका बसत आहे. निवडणुकीपूर्वी एका विचारसरणीच्या नावावर मते मागायची आणि निवडून आल्यानंतर दुसऱ्याच पक्षात प्रवेश करायचा, ही प्रवृत्ती मतदारांच्या विश्वासालाच तडा देणारी आहे. त्यामुळे पक्षांतरबंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही लोकशाहीच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे.

लोकशाही व्यवस्थेत विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका हे तीनही स्तंभ परस्पर संतुलन राखून कार्य करतात. जर विधिमंडळातील सदस्य संविधानाच्या भावनेविरुद्ध वर्तन करत असतील किंवा कायद्याचा अतिरेकी व स्वार्थी वापर करत असतील, तर न्यायपालिकेने संविधानाचा संरक्षक म्हणून हस्तक्षेप करणे आवश्यक ठरते. न्यायालयाची भूमिका ही केवळ वाद सोडविण्यापुरती मर्यादित नसून संविधानिक मूल्यांचे संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे.

आज गरज आहे ती पक्षांतरबंदी कायद्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्याची. अपात्रतेच्या प्रकरणांवर निर्णय देण्यासाठी निश्चित कालमर्यादा निश्चित करणे, अध्यक्षांच्या निर्णय प्रक्रियेला अधिक पारदर्शक बनविणे आणि आवश्यक असल्यास स्वतंत्र घटनात्मक न्यायाधिकरणाची स्थापना करणे, अशा सुधारणांचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे कायद्याचा गैरवापर कमी होईल आणि लोकशाहीवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल.

उद्धव ठाकरे गटातील सहा खासदारांचे प्रकरण हे केवळ एका पक्षापुरते मर्यादित नसून भारतीय लोकशाहीच्या भवितव्याशी संबंधित आहे. या प्रकरणात लोकसभा अध्यक्षांचा निर्णय, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनात्मक तत्त्वांचा सन्मान आणि पक्षांतरबंदी कायद्याच्या मूळ उद्देशाची प्रभावी अंमलबजावणी या तिन्ही गोष्टींची खरी कसोटी लागणार आहे.

भारतीय संविधान हे केवळ शासन चालविण्याचे पुस्तक नाही, तर लोकशाहीचे नैतिक अधिष्ठान आहे. त्याचे संरक्षण करणे ही केवळ न्यायालयाची किंवा लोकप्रतिनिधींची जबाबदारी नसून संपूर्ण लोकशाही व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे. संविधानाच्या चौकटीत राहून, जनादेशाचा सन्मान राखून आणि न्यायप्रक्रियेला गती देऊनच भारतीय लोकशाही अधिक सक्षम, उत्तरदायी आणि विश्वासार्ह बनू शकते. हीच आजच्या घडीची सर्वात मोठी लोकशाहीची गरज आणि जनतेची रास्त अपेक्षा आहे.

**प्रा. डॉ. प्रशांत विघे**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख,**
**भारतीय महाविद्यालय अमरावती तथा सिनेट सदस्य,**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती**
**९३२६८७७७४९**



# एशियन इन्स्टिट्यूट ऑफ फायर सेफ्टी, गोंदियाच्या विद्यार्थ्यांची देशातील नामांकित कंपन्यांमध्ये निवड!

**दैनिक युवक आधार**
**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी :** स्थानिक 'एशियन इन्स्टिट्यूट ऑफ फायर सेफ्टी' (AIFS), गोंदियाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या आणि दर्जेदार प्रशिक्षणाच्या जोरावर देशातील प्रतिष्ठित औद्योगिक कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून संस्थेचा व जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे. चालू शैक्षणिक सत्र २०२५-२६ संपण्यापूर्वीच संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांच्या फायर आणि सेफ्टी विभागात निवड झाली आहे.

या यशाबद्दल माहिती देताना संस्थेचे प्राचार्य श्री. अविनाश चौरसिया यांनी सांगितले की, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर अवघ्या ६ ते ८ महिन्यांतच विद्यार्थ्यांसाठी 'ऑन-जॉब ट्रेनिंग'च्या अनेक संधी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. परिणामी, अभ्यासक्रम (कोर्स) पूर्ण होण्याआधीच अनेक विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली, ज्यामुळे त्यांना शिक्षण संपताच तात्काळ रोजगार मिळण्यास मोठी मदत झाली आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उत्तम करिअर पर्याय: प्राचार्य श्री. चौरसिया पुढे म्हणाले की, आर्थिकदृष्ट्या कमकुवत, गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना कमीत कमी वेळेत रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने 'फायर अँड इंडस्ट्रियल सेफ्टी' हे क्षेत्र आज एक अत्यंत प्रभावी आणि सुवर्ण करिअर पर्याय बनले आहे. एशियन इन्स्टिट्यूट ऑफ फायर सेफ्टीचा उद्देश विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी किंवा गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे एवढाच नसून, उद्योगांच्या (इंडस्ट्री) सद्य गरजांनुसार त्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षित करून एक यशस्वी करिअर मिळवून देणे हा आहे.




**■ शैक्षणिक सत्र २०२५-२६ संपण्यापूर्वीच अनेक विद्यार्थ्यांना मिळाली रोजगाराची सुवर्णसंधी**
**■ प्रशिक्षण पूर्ण होण्याआधीच अनेक विद्यार्थ्यांची 'ऑन-जॉब ट्रेनिंग'च्या माध्यमातून निवड**

संस्थेची वैशिष्ट्ये आणि दर्जेदार प्रशिक्षण: संस्थेमध्ये अनुभवी आणि तज्ञ प्रशिक्षकांद्वारे उच्च दर्जाचे व्यावहारिक (प्रॅक्टिकल) आणि तांत्रिक प्रशिक्षण दिले जाते. यासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेळोवेळी इंटरव्ह्यू स्किल्स (मुलाखत कौशल्य) आणि पर्सनालिटी डेव्हलपमेंट क्लासेस, फायर सेफ्टी सेमिनार, इंडस्ट्रियल व्हिजिट, गोंदिया फायर स्टेशन व्हिजिट, एअरपोर्ट फायर स्टेशन व्हिजिट आणि देशातील प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये प्रॅक्टिकल अप्रेंटिस यांसारख्या विविध सुविधा उपलब्ध करून दिली जातात. यामुळेच एशियन इन्स्टिट्यूट ऑफ फायर सेफ्टी, गोंदिया ही संस्था आज फायर व इंडस्ट्रियल सेफ्टी शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांची पहिली पसंती ठरत आहे.

निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे: संस्थेमधून यशस्वीरित्या निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने कार्तिक धानजोडे, धनेश आरमो, मनीष कुमार, कार्तिक रहांगडाले, सौरभ सोमवंशी, समीर पटले, सौम्य चौरसिया, दगेश्वर कापगते, सिद्धार्थ लांजेवार, दिनेश बावणे, प्रणय नागपुरे, चेतन सहारे, प्रणव रिनाईत, शुभम निन्हावे, नरेंद्र दुधपच, अजित नागेश्वर, कृष्णा बिसेन, शंकर बाहेश्वर, आकाश लिल्हारे, कुलदीप पारधी, आकाशकुमार तिवाडे आणि सुरेंद्र ठाकरे यांचा समावेश आहे.या सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे व्यवस्थापन (मॅनेजमेंट) आणि प्राचार्यांनी अभिनंदन केले असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच हे विद्यार्थी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर संस्था आणि गोंदिया जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर अधिक उंचावतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाची तहसीलदार दिपक पुंडे यांच्याशी जनहिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा!

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** मालेगाव निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय गणेश कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली संघाच्या वतीने मालेगाव शहरासह ग्रामीण भागातील विविध जनहिताच्या प्रश्नांसंदर्भात तहसीलदार दिपक पुंडे यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे वाढत्या अवैध धंद्यांमुळे बिघडत चाललेली सामाजिक परिस्थिती, युवकांमध्ये वाढणारे व्यसन, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या हिताशी निगडित विविध विषय प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

यावेळी संघाचे जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. त्यांच्यासमवेत दैनिक समतापथ रिसोड–मालेगाव तालुका प्रतिनिधी गोपाल बोरकर पाटील उपस्थित होते.

निवेदनामध्ये मालेगाव शहरासह ग्रामीण भागात सुरू असलेल्या वरली मटका, गुटखा, देशी-विदेशी दारू, हातभट्टी दारू तसेच इतर बेकायदेशीर धंद्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. अशा अवैध व्यवसायांमुळे परिसरातील युवक मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत असून अनेक कुटुंबांचे संसार आर्थिक व सामाजिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत आहेत. महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असून शांतता व सुव्यवस्थेलाही बाधा निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांनी



तहसीलदार दिपक पुंडे यांच्यासोबत विविध जनहिताच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविणे, संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय वाढविणे, युवकांना व्यसनमुक्तीसाठी जनजागृती करणे, तसेच नागरिकांकडून मिळणाऱ्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे, अशा अनेक मुद्द्यांवर त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

यावेळी तहसीलदार दिपक पुंडे यांनी संघाने मांडलेल्या सर्व मुद्द्यांचे गांभीर्य ओळखून निवेदनाची सखोल दखल घेतली. प्रशासनाकडे आलेल्या प्रत्येक जनहिताच्या प्रश्नाची कायद्याच्या चौकटीत राहून योग्य ती कार्यवाही केली जाईल. संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक त्या सूचना देण्यात येतील तसेच नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत प्रशासन सकारात्मक भूमिका घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय गणेश कचकलवार यांच्या नेतृत्वाखाली निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ समाजहिताचे प्रश्न सातत्याने शासन व प्रशासनापर्यंत पोहोचवत असून, सर्वसामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघ कायम लढा देत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.जिल्हाध्यक्ष करण

**"निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाने सादर केलेल्या निवेदनातील प्रत्येक मुद्द्याची गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे. संबंधित विभागांना आवश्यक सूचना देऊन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. जनहिताच्या प्रश्नांबाबत प्रशासन कोणतीही हलगर्जी करणार नाही आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल."**

**— श्री.दिपक पुंडे**
**तहसीलदार, मालेगाव**

धोंगडे यांनी सांगितले की, पत्रकार संघ हा केवळ पत्रकारांच्या प्रश्नांसाठीच नव्हे तर सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठीही सातत्याने आवाज उठवत आहे. मालेगाव तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्या मार्गी लागाव्यात, हा संघाचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहणार आहे. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी झाली नाही, तर संघाच्या वतीने लोकशाही मार्गाने पुढील आंदोलनाचा विचार करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तहसीलदार कार्यालयात झालेल्या या चर्चेचे वातावरण सकारात्मक राहिले. प्रशासन आणि सामाजिक संघटनांमधील समन्वयातून जनहिताचे प्रश्न अधिक प्रभावीपणे सोडविता येऊ शकतात, असा विश्वास दोन्ही बाजूंनी व्यक्त करण्यात आला.

# सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू; ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ व इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने राज्य शासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. तेंव्हा ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

सुधारित योजनेनुसार अधिसूचित महसूल मंडळामध्ये अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाईचा लाभ मिळणार आहे. खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या एकूण १४ पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, बदलत्या हवामानामुळे शेतीपुढील जोखीम वाढत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या उत्पादनाला आर्थिक संरक्षण देण्यासाठी पीक विमा योजना अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांनी या योजनेत मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे,असे आवाहन त्यांनी केले.

या योजनेत सहभागी होण्यासाठी अन्नधान्य, कडधान्य व तेलबिया पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ २ टक्के विमा हप्ता भरावा लागणार असून, कापूस आणि कांदा या व्यापारी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के हप्ता भरावा लागणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. शेतकरी National Crop Insurance Portal (NCIP) वर ऑनलाइन अर्ज करून सहभाग नोंदवू शकतात. तसेच बँका, कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) किंवा स्वतः ऑनलाइन अर्ज भरूनही योजनेचा लाभ घेता येणार आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक (AgriStack) नोंदणी क्रमांक बंधनकारक करण्यात आला असून, शेतकऱ्यांकडे जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक तसेच आधारशी संलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. याशिवाय शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचा डिजिटल क्रॉप सर्व्हे करणे अनिवार्य आहे. डिजिटल क्रॉप सर्व्हेमध्ये नोंदविलेल्या पिकाची माहिती आणि विम्यासाठी अर्जात नमूद केलेल्या पिकामध्ये तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्व्हेतील नोंद अंतिम मानली जाईल आणि तफावत सिद्ध झाल्यास संबंधित विमा अर्ज रद्द करण्यात येईल याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यायची आहे.

योजनेचा गैरफायदा घेण्यासाठी चुकीची अथवा खोटी माहिती देऊ नये. तसे झाल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे कृषी विभागाच्या विविध योजनांपासून वंचित राहावे लागणार असल्याचा इशाराही कृषी मंत्र्यांनी दिला आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित पिकाखाली किमान ०.१० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. योजनेसंदर्भात कोणतीही अडचण अथवा अधिक माहिती आवश्यक असल्यास संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा १४४४७ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधता येईल.

हवामान विभागाने चालू वर्षासाठी पावसाबाबत व्यक्त केलेल्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आर्थिक जोखीम कमी करण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नमूद केले. राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी विमा योजनेत सहभाग नोंदवून या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# शेलगाव जहागीर अत्याचारप्रकरण पेटले; आरोपींवर ३०७ कलम लावण्याची जोरदार मागणी, डीवायएसपींकडून संध्याकाळपर्यंत कारवाईचे आश्वासन!

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा सिद्धार्थ धंदरे जिल्हा प्रतिनिधी** : चिखली,शेलगाव जहागीर येथे एका मागासवर्गीय महिलेवर झालेल्या कथित अमानुष अत्याचारप्रकरणी आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांना तातडीने अटक करावी, तसेच या गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेतील (पूर्वीच्या भारतीय दंड संहितेतील) खुनाच्या प्रयत्नासंदर्भातील ३०७ कलमाचा समावेश करावा, अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी चिखली पोलीस ठाण्यात धडक देत निवेदन सादर केले.

शेलगाव जहागीर येथे संबंधित महिलेस लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आल्याचा तसेच तिच्यावर गंभीर स्वरूपाचा शारीरिक अत्याचार झाल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, पीडितेला तातडीने न्याय मिळावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने चिखली पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांची भेट घेऊन आरोपींना त्वरित अटक करावी, त्यांच्यावर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह लागू असलेल्या सर्व



संबंधित गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवून ३०७ कलमाचाही समावेश करण्यात यावा, अशी मागणी केली.

दरम्यान, या संदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) यांच्याशीही चर्चा करण्यात आली. या चर्चेदरम्यान गुन्ह्यात ३०७ कलम लागू करण्याबाबत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून आज संध्याकाळपर्यंत त्यासंदर्भात कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन डीवायएसपी यांनी दिल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

याप्रसंगी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या अमानुष घटना समाजात भीती आणि अस्वस्थता निर्माण

## वंचित बहुजन आघाडीचे चिखली पोलीस ठाण्यावर धडक आंदोलन; पीडितेला न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा इशारा

करणाऱ्या आहेत. पीडितेला न्याय मिळण्यासाठी आरोपींवर निष्पक्ष, कठोर आणि जलद कारवाई होणे अत्यावश्यक असून, दोषींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाऊ नये. कायद्याचा धाक कायम ठेवण्यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, आरोपींना तात्काळ अटक करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यात यावी, पीडित महिलेस आवश्यक संरक्षण व शासकीय मदत मिळावी आणि संपूर्ण प्रकरणाचा तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पारदर्शकपणे करण्यात यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांच्यासह चिखली शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पीडितेला न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

शिष्टमंडळाने गुन्ह्यात ३०७ कलमाचा समावेश करण्याची जोरदार मागणी केली. यासंदर्भात डीवायएसपी यांच्याशी चर्चा झाल्यानंतर "आज संध्याकाळपर्यंत ३०७ कलम लागू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही केली जाईल," असे आश्वासन देण्यात आल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. मात्र, या कलमाचा प्रत्यक्ष समावेश झाल्याची अधिकृत नोंद किंवा पोलीस पुष्टी उपलब्ध झाल्यानंतरच ती अंतिम मानली जाईल.

# सुकळी, मुर्ली पायी दिंडीचे पंढरपूरकडे भक्तिमय प्रस्थान; महागावात जल्लोषात स्वागत

## सुरोशे परिवाराचा सेवाभावी उपक्रम; सुरेश नरवाडे यांचे विशेष सहकार्य

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ मनोज सुरोशे महागाव:** आषाढी वारीनिमित्त सुकळी येथून पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडीचे महागाव येथे उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करत "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "जय हरी विठ्ठल" च्या अखंड गजरात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

राजुभाऊ गावंडे व उज्वला ताई गावंडे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पायी वारी करत आहेत. या दिंडीत येळाबारा, सुकळी, मुरली तसेच परिसरातील अनेक गावांतील भाविक मोठ्या श्रद्धा आणि उत्साहाने सहभागी झाले आहेत.

दि. ३० जून रोजी दिंडीचे प्रस्थान झाल्यानंतर दि. ४ जुलै रोजी दिंडी महागाव येथे दाखल झाली. यावेळी सुरोशे परिवाराच्या वतीने वारकऱ्यांचे पुष्पवृष्टी करून प्रेमपूर्वक स्वागत करण्यात आले. तसेच



**विठ्ठलनामाचा अखंड गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भक्तीचा अविरत प्रवाह म्हणजेच आषाढी वारी. सुकळी–मुरली पायी दिंडीचे पंढरपूरकडे भक्तिभावाने प्रस्थान होत असताना महागाव येथे वारकऱ्यांचे स्वागत करण्याचे सौभाग्य सुरोशे परिवाराला लाभले, ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.फुलांच्या वर्षावात, प्रेम, आपुलकी आणि भक्तिभावाने वारकऱ्यांचे स्वागत करताना मन भरून आले. वारकऱ्यांची सेवा म्हणजेच श्री विठ्ठलाची सेवा, ही भावना मनात ठेवून आम्ही हा छोटासा सेवाभाव जपण्याचा प्रयत्न केला.श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी एकच प्रार्थना— सर्व वारकऱ्यांची पायी वारी सुखरूप, मंगलमय व निर्विघ्न पार पडो. सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद नांदो.**

**जय हरी विठ्ठल! जय जय विठ्ठल!**
**—मनोज उर्फ एम. डी. सुरोशे, महागाव**

वारकऱ्यांसाठी अल्पोपहार, पाण्याची व्यवस्था करून भोजन व शुद्ध पिण्याच्या सेवाभावाची अनोखी परंपरा जपण्यात आली.

या स्वागत सोहळ्यास दीपकराव सुरोशे, सौ. दुर्गा सुरोशे, मनोज उर्फ एम. डी. सुरोशे, राणी सुरोशे, रवींद्र सुरोशे, मृण्मयी, रियांश, गार्गी, श्रीकांत सुरोशे, तसेच सुरेश नरवाडे, जीवन नरवाडे ,आलोक कराळे, परी, काव्या यांनी विशेष सहकार्य केले.

भर पावसातही टाळ-मृदुंगाच्या निनादात, अभंग-भजनांच्या स्वरात आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजरात वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत असल्याचे प्रेरणादायी चित्र पाहायला मिळाले. वारकऱ्यांची निष्ठा, शिस्त, सेवाभाव आणि विठ्ठलावरील अखंड श्रद्धा पाहून उपस्थित नागरिकही भारावून गेले.

आषाढी वारीचा हा पवित्र सोहळा समाजात भक्ती, समता, सेवा आणि बंधुभावाचा संदेश देणारा ठरत असून, वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने जपली जात असल्याचे या स्वागत सोहळ्यातून अधोरेखित झाले.

# श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या राष्ट्रवादी विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन – केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी नागपूर महानगर तर्फे आयोजित कार्यकर्ता संमेलनात केंद्रीय मंत्री मा. नितीनजी गडकरी यांनी "भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी" या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान देत कार्यकर्त्यांना राष्ट्रवाद, संघटन आणि समाजसेवेचा संदेश दिला.आपल्या मार्गदर्शनात नितीनजी गडकरी यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेत भारतीय जनसंघाच्या स्थापनेमागील राष्ट्रवादी विचार स्पष्ट केले. डॉ. मुखर्जी यांनी राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान देत अखंड भारताच्या संकल्पनेसाठी आणि देशाच्या एकात्मतेसाठी आयुष्य समर्पित केले. जम्मू-काश्मीरमध्ये लागू असलेल्या स्वतंत्र व्यवस्था, स्वतंत्र ध्वज आणि स्वतंत्र संविधानाला त्यांनी ठाम विरोध केला. "एक देश, एक संविधान, एक प्रधान आणि एक निशाण" या भूमिकेसाठी त्यांनी केंद्रीय मंत्रिपदाचा त्याग करून संघर्ष केला. त्याग, राष्ट्रनिष्ठा आणि वैचारिक स्पष्टता हीच डॉ. मुखर्जी यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख असल्याचे गडकरी यांनी सांगितले. यावेळी त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर भाष्य करत राष्ट्र प्रथम हीच पक्षाची मूलभूत भूमिका असल्याचे स्पष्ट केले. भारतीय जनता पक्ष कोणत्याही धर्म, पंथ किंवा समाजाच्या विरोधात नसून




सर्व समाजाला समान न्याय, समान संधी आणि विकास देण्याच्या विचाराने कार्य करतो. भारताची संस्कृती, इतिहास आणि वारसा हा सर्व भारतीयांचा समान वारसा असून संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा पक्ष पूर्ण आदर करतो, असे त्यांनी नमूद केले.देशात तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे सामाजिक तेढ वाढल्याचे सांगत गडकरी यांनी सर्वधर्म समभाव, सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय एकात्मता हीच भारताच्या प्रगतीची खरी दिशा असल्याचे प्रतिपादन केले. जात, पंथ, धर्म, भाषा किंवा प्रांत यांच्या आधारावर समाजात भेदभाव निर्माण करण्याऐवजी सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. लोकप्रतिनिधी हा केवळ मतदान करणाऱ्यांचाच नव्हे तर प्रत्येक नागरिकाचा प्रतिनिधी असतो आणि सर्वांसाठी समान भावनेने काम करणे हेच लोकसेवेचे खरे तत्त्व असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.भय, भूक, दहशतवाद आण भ्रष्टाचारमुक्त भारत घडविणे, गाव, गरीब, शेतकरी, कामगार आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे तसेच आत्मनिर्भर भारताची उभारणी करणे, हेच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या विचारांचे खरे उद्दिष्ट असल्याचे गडकरी यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन सर्वसमावेशक आणि सक्षम भारत निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.सुरुवातीला कार्यक्रमाची प्रास्ताविक भाषण करतांना भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या कार्यावर प्रकाश टाकून कार्यकर्त्यांना आजही या विचारांची किती गरज आहे याबद्दल माहिती दिली.यावेळी मंचावर भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी आमदार मिलिंद माने, प्रदेश मंत्री अर्चनाताई डेहनकर, मनपा सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भाजप शहर महामंत्री श्रीकांत आगलावे यांनी केले.

# पीक विमा घ्या... अन्यथा नुकसानभरपाईला मुकाल!

## ३१ जुलै अंतिम मुदत; Farmer ID व डिजिटल पीक सर्वेक्षणाशिवाय अर्ज ग्राह्य नाहीत – तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव खरीप हंगाम २०२६ मध्ये नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, कीड व रोगांमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळावे, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY) राबविण्यात येत आहे. मालेगाव तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या पिकांचे आर्थिक संरक्षण करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी केले आहे.

यंदा खरीप हंगामात ही योजना Cup & Cap Model (८०:११०) नुसार राबविण्यात येत असून, पीक विमा अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे. शेवटच्या दिवसाची गर्दी टाळून वेळेत अर्ज करण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी केले आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी AGRISTACK Farmer ID असणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्याचबरोबर डिजिटल पीक सर्वेक्षण (Digital Crop Survey) अंतर्गत ७/१२ वर पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे. पीक विमा अर्जातील पीक आणि डिजिटल सर्वेक्षणातील पीक यामध्ये तफावत आढळल्यास संबंधित विमा अर्ज रद्द केला जाऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी सर्व माहिती अचूक




**"प्रधानमंत्री पीक विमा योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची आणि आर्थिक सुरक्षेची महत्त्वपूर्ण योजना आहे. प्रत्येक पात्र शेतकऱ्याने Farmer ID तयार करून डिजिटल पीक सर्वेक्षणाची नोंद पूर्ण करावी आणि ३१ जुलैपूर्वी पीक विमा अर्ज भरावा. शेवटच्या दिवसाची गर्दी टाळून वेळेत अर्ज केल्यास नैसर्गिक संकटात आर्थिक आधार निश्चित मिळू शकतो. कोणत्याही प्रकारची चुकीची माहिती किंवा फसवणूक टाळावी आणि शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा."**

**— कैलास देवकर**
**तालुका कृषी अधिकारी, मालेगाव**

भरावी, असेही कैलास देवकर यांनी स्पष्ट केले.

सुधारित योजनेनुसार प्रति अर्ज किमान ०.१० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे ऐच्छिक आहे. भाडेपट्टीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकरार अपलोड करणे बंधनकारक राहणार आहे.

शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी ठेवण्यासाठी अन्नधान्य व गळीत धान्य पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ २ टक्के, तर कापूस, कांदा यांसारख्या नगदी पिकांसाठी ५ टक्के किंवा वास्तवदर्शी दर यापैकी जे कमी असेल तो हप्ता भरावा लागणार आहे. अल्प प्रीमियममध्ये मोठे आर्थिक संरक्षण मिळत असल्याने प्रत्येक पात्र शेतकऱ्याने या योजनेचा लाभ घ्यावा, असे तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी सांगितले.

बिगर कर्जदार तसेच इच्छुक कर्जदार शेतकरी आपले सरकार सेवा केंद्र (CSC), राष्ट्रीय पीक विमा पोर्टल, क्रॉप इन्शुरन्स ॲप तसेच व्यापारी व सहकारी बँकांच्या स्थानिक शाखांमार्फत अर्ज दाखल करू शकतात. याशिवाय गावातील कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फतही आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे.

यंदा शासनाने पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकतेला विशेष प्राधान्य दिले आहे. दुसऱ्याच्या जमिनीवर, मृत शेतकऱ्याच्या नावाने किंवा इतर कोणत्याही प्रकारे बोगस पीक विमा उतरविल्याचे आढळल्यास संबंधित व्यक्तीवर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. एवढेच नव्हे तर अशा लाभार्थ्यांना पीक विमा योजना तसेच नमो शेतकरी महासन्मान योजनेसह कृषी विभागाच्या सर्व डीबीटी योजनांपासून पुढील पाच वर्षांसाठी वंचित ठेवण्यात येणार असल्याचा कठोर इशाराही तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी दिला आहे.

मालेगाव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ३१ जुलै २०२६ पूर्वी पीक विमा अर्ज सादर करावा. नैसर्गिक संकटांमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळविण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी केले आहे.

# सिल्लोडमध्ये 'अमृत युवा शासन संवाद' उपक्रमाचा शुभारंभ

## विद्यार्थ्यांना शासकीय योजनांची दिली प्रत्यक्ष माहिती

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था 'अमृत'च्या वतीने सिल्लोड येथील तहसील कार्यालयात 'अमृत युवा शासन संवाद' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रथमच या उपक्रमाची सुरुवात सिल्लोड तहसील कार्यालयातून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार अंकिता ताकभाते होत्या. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, शासन आणि युवक यांच्यात थेट संवाद निर्माण करणारा हा अत्यंत उपयुक्त उपक्रम असल्याचे सांगितले. यावेळी तहसील कार्यालयातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शासकीय योजना, त्यांचे लाभ, तसेच आवश्यक कागदपत्रांची सविस्तर माहिती दिली. विविध प्रमाणपत्रे व शासकीय कागदपत्रे कशी तयार केली जातात, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. अनेक विद्यार्थ्यांनी ही त्यांची तहसील कार्यालयातील पहिलीच भेट असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी दिलेले मार्गदर्शन समजण्यास सोपे व उपयुक्त असल्याचे सांगत, भविष्यात स्वतःची कागदपत्रे तयार करताना आणि गावातील नागरिकांना मार्गदर्शन करताना या माहितीचा नक्कीच उपयोग होईल, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

'अमृत'चे जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. हा उपक्रम

**"सिल्लोड तहसील कार्यालयातून या उपक्रमाचा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पहिला शुभारंभ होत असल्याचा आम्हाला आनंद आहे. तहसीलदार अंकिता ताकभाते मॅडम, तहसील कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे हा कार्यक्रम अधिक यशस्वी झाला."**

**- योगेश रोडे, अमृत जिल्हा उपव्यवस्थापक, छत्रपती संभाजीनगर.**



अमृतचे राज्य व्यवस्थापक दीपक जोशी, मराठवाडा विभाग प्रमुख अमित सामंत आणि विभागीय उपव्यवस्थापक ओंकार शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या कार्यक्रमाला अमृतचे जिल्हा व्यवस्थापक अक्षय लंबे, जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे, राज कॉम्प्युटरच्या संचालिका जयश्री कुलकर्णी, सहायक महसूल अधिकारी अशोक दराडे, पुरवठा विभागाचे बळीराम मुंडे, संजय गांधी योजना विभागाचे अशोक मोरे तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सत्ताधारी नगरसेवकाचा घरचा आहेर; कचरा नेऊन थेट नगरपरिषदेतच टाकला

## "भ्रष्टाचाराचा करा निचरा... अन्यथा कचरा नगरपरिषदेतच टाकू"चा इशारा; शहरातील कचरा व्यवस्थापनावर संतप्त होत भाजपचे युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांचे अनोखे आंदोलन



**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर अखेर जनतेचा संताप नगरपरिषद कार्यालयापर्यंत पोहोचला. शहरातील विविध प्रभागांमध्ये अनेक दिवसांपासून कचरा गाड्या वेळेवर न आल्याने नागरिक त्रस्त झाले असताना सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखेडे यांनी शुक्रवारी नगरपरिषद प्रशासनाविरोधात थेट आक्रमक भूमिका घेत चक्क कचऱ्याने भरलेली गाडी नगरपरिषद कार्यालयात आणून कचरा टाकत अनोखे आंदोलन केले. "भ्रष्टाचाराचा करा निचरा... अन्यथा कचरा नगरपरिषदेतच टाकू," अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. काही काळ नगरपरिषद परिसरात दुर्गंधी पसरली असून या आंदोलनाची शहरभर जोरदार चर्चा सुरू आहे.

शहरातील अनेक प्रभागांमध्ये कचरा उचलण्यात सातत्याने होत असलेल्या अनियमिततेमुळे रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सफाई कर्मचाऱ्यांना ठेकेदाराकडून वेळेवर वेतन मिळत नसल्याने स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचाही आरोप यावेळी करण्यात आला.

अनेक वेळा नगरपरिषद प्रशासनाकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर जनतेच्या वतीने हे आंदोलन करावे लागल्याचे नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखेडे यांनी सांगितले. शहरातील प्रत्येक प्रभागात नियमित कचरा उचलला जावा, नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ नये आणि स्वच्छता व्यवस्थेतील त्रुटी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

> **"जनतेच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. शहरातील प्रत्येक प्रभागात नियमित कचरा उचलला गेला पाहिजे. स्वच्छता व्यवस्थेतील त्रुटी तातडीने दूर न झाल्यास नागरिकांना सोबत घेऊन यापेक्षाही मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल."**
>
> **— सतीश उर्फ गल्ला वानखेडे**
> **युवा नगरसेवक,वाशिम नगर परिषद**

विशेष म्हणजे, स्वतः सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक असूनही जनहिताच्या प्रश्नावर प्रशासनालाच जाब विचारण्याची भूमिका सतीश उर्फ गल्ला वानखेडे यांनी घेतली आहे. प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक म्हणून पदभार स्वीकारल्यापासून त्यांनी नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर स्वतःच्या पुढाकारातून पाणीटँकरची व्यवस्था करून अनेक नागरिकांना दिलासा दिला. शहरातील स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक उद्याने, पाणीपुरवठा तसेच इतर नागरी प्रश्नांवरही ते सातत्याने प्रशासनाचे लक्ष वेधत असतात. जनतेने दिलेल्या विश्वासाची परतफेड कामातूनच करायची, या भूमिकेतून ते कार्यरत असल्याचे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे.

या आंदोलनामुळे शहरातील केवळ एका प्रभागाचा नव्हे तर संपूर्ण वाशिम शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सत्ताधारी पक्षातील नगरसेवकानेच प्रशासनाविरोधात उघड भूमिका घेतल्याने राजकीय वर्तुळातही या घटनेची चर्चा रंगली आहे.

या संदर्भात वाशिम नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक सुदाम चव्हाण यांनी सांगितले की, संबंधित प्रभागातील कचरा गाडी तांत्रिक बिघाडामुळे दोन ते तीन दिवस बंद होती. त्यामुळे त्या भागात कचरा उचलला गेला नाही. मात्र इतर सर्व कचरा गाड्या नियमित सुरू असून संबंधित गाडीही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# औरंगाबाद जिल्हा बँक निवडणुकीत आबासाहेब काळे यांचा ३६:० ऐतिहासिक विजय;सोयगावात जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत मा.आबासाहेब काळे यांनी ३६-० असा ऐतिहासिक विजय संपादन करत नेतृत्वावर असलेला विश्वास पुन्हा एकदा सिद्ध केला.या दणदणीत विजयामागे सन्माननीय कार्यसम्राट आमदार अब्दुल सत्तार यांच्या दमदार नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.या ऐतिहासिक विजयाचा



आनंद सोयगाव शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच आमदार अब्दुल सत्तार,यांच्या संपर्क कार्यालयासमोर व जुन्या बाजार चौकात शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला. "अब्दुल सत्तार साहेबांचा विजय असो" आणि "आबासाहेब काळे यांचा विजय असो" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.यावेळी गटनेते अक्षय काळे,ॲड योगेश पाटील,युवा सेनेचे कुणाल राजपूत,

शहर प्रमुख संतोष बोडखे,नगरसेवक कदिर शहा,बंटी भाऊ काळे,मोतीराम शेट पंडित,कृष्णा शेट गोळेगावकर, रमेश गव्हाडे,लतीफ शहा,गजानन कुंडके,दीपक पगारे,संदिप सुरडकर,भगवान जोहरे,किशोर मापारी,अमोल मापारी,नारायण घनगाव,पंड्या काळे,अजित काळे,सुनील काळे,भैय्या काळे,यांच्यासह शहरातील शिवसैनिक,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा.आबासाहेब काळे यांच्या या ऐतिहासिक विजयाबद्दल उपस्थितांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.तसेच औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व नवनिर्वाचित संचालकांचेही अभिनंदन करून त्यांच्या पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# रामनगर ट्रान्झिट कॅम्प येथे वडाचे विशाल झाड कोसळले; सुदैवाने जीवितहानी टळली

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर, (केतन भोज):** सतत सुरू असलेल्या पावसामुळे घाटकोपर (पश्चिम) येथील रामनगर अ ट्रान्झिट कॅम्प परिसरात रविवारी वडाचे मोठे झाड अचानक कोसळल्याची घटना घडली.सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा कोणाला गंभीर दुखापत झाली नाही.रामनगर 'अ' हा परिसर मुख्य रहदारीचा मार्ग असल्याने या मार्गावर नेहमीच नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते.झाड कोसळण्याच्या वेळी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.मात्र,सुदैवाने



कोणतीही अप्रिय घटना घडली नाही.घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते प्रशांत मुके आणि करण इंगवले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.तसेच त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभागाला घटनेची माहिती देत झाड हटविण्यासाठी त्वरित कारवाई करण्याची मागणी केली.या घटनेमुळे परिसरातील रहदारी व वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धोकादायक स्थितीत असलेल्या झाडांची तातडीने पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी,अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सिल्लोड: भवन शिवारात सिद्धेश्वर कारखान्यात बेकायदा वृक्षतोड

## वनविभागाच्या भूमिकेवर स्थानिकांचा सवाल

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील भवन शिवारातील सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या परिसरात ३० ते ४० वर्षे जुन्या फळझाडांची कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता तोड करण्यात येत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. आंबा, सीताफळ, रामफळ व लिंबू यांसारख्या बहुमोल वृक्षांची झालेली ही तोड पर्यावरणाचे नुकसान करणारी असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सदर वृक्षतोड काल रविवारी (दि. ५ जुलै) सुटीचा दिवस साधून नियोजनबद्धरीत्या करण्यात आली. सुटी असल्याने वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी उपलब्ध नव्हते. अशा संवेदनशील वेळी वनविभागाची भूमिका काय असेल? आणि वृक्षतोड करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होईल का? असे प्रश्न उपस्थित करून स्थानिकांनी प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

सदर वृक्षतोड प्रकरणी वन विभागाने तातडीने घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी करावी, तसेच वन कायद्यातील तरतुदींनुसार या घटनेचा तातडीने पंचनामा करून दोषींवर नियमानुसार कठोर दंडात्मक व कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींकडून करण्यात आली आहे.

# वृद्ध मातांना साडी–चोळी वाटप व वृक्षारोपण

## जनाई निराधार वृद्धाश्रमात वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी:** वाढदिवसाचा अनावश्यक आणि बडेजावी खर्च टाळून समाजातील ज्येष्ठ घटकांना आनंद देण्याच्या उद्देशाने अकोट येथील 'जनाई निराधार वृद्धाश्रमात' एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. प्रीती सागर बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित या वृद्धाश्रमात 'महिला शक्ती फाउंडेशन'च्या पदाधिकाऱ्यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्ध माता व दिव्यांगांना साडी-चोळी वाटप आणि वृक्षारोपण करण्यात आले. आपुलकीच्या या भेटीमुळे वृद्ध मातांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.

**कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम आराध्य दैवत**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून व पूजन करून करण्यात आली. महिला शक्ती फाउंडेशनचे केंद्रीय सचिव गणेश वाकोडे, अकोला जिल्हा उपाध्यक्ष कविता भागवत आणि सागर रजाने या तिन्ही



पदाधिकाऱ्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा सोहळा आयोजित केला होता. वृद्धाश्रमातील आजींना सोबत घेऊन केक कापून अत्यंत उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला.

त्यानंतर वृद्धाश्रमातील सर्व उपस्थित वृद्ध व दिव्यांग महिलांना सन्मानाची साडी आणि चोळी भेट म्हणून देण्यात आली. हक्काची माणसे दूर असताना, अनपेक्षितपणे मिळालेली ही अमूल्य भेट आणि जिव्हाळा पाहून अनेक वृद्ध मातांचे डोळे पाणावले. त्यांनी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना भरभरून आशीर्वाद दिले.

"वृद्धाश्रमातील आईसमान असणाऱ्या या मातांच्या चेहऱ्यावरचा आनंद हीच माझ्या वाढदिवसाची खरी आणि सर्वोत्तम भेट आहे," अशी भावना वाढदिवस असलेल्या पदाधिकाऱ्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

या कार्यक्रमादरम्यान अजय घनबहादुर यांनी स्वहस्ते बनवलेला एक सुंदर हस्ताकृती फोटोग्राफ वाढदिवसानिमित्त सप्रेम भेट दिला. हा उत्कृष्ट फोटो पाहून उपस्थित मान्यवरांनी प्रियांका अजय घनबहादूर यांच्या सत्कार प्रसंगी त्यांचे कौतुक केले. यासोबतच वृद्धाश्रम परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरणाचा संदेशही देण्यात आला.

या कौतुकास्पद सोहळ्याला महिला शक्ती फाउंडेशनचे संस्थापक सुदेश रजाने, केंद्रीय अध्यक्ष लक्ष्मी गावंडे, उपाध्यक्ष विश्वासराव पाचपाटील, कोषाध्यक्ष सुरेंद्र मोरे, प्रदेश अध्यक्ष एस्तेर जामनिक, सदस्य अनुवृत्ती गुहे, पुष्पा तिहिले, बोर्डी ग्रामपंचायत सदस्या दीक्षा रजाने, आयुर्वेदिक कंपनीचे अनिल टेकाळे, तांडगे, ज्येष्ठ पत्रकार देवानंद खीरकर, पत्रकार शेख अहमद, दिव्यांग संघटनेचे अनिल राऊत, नागनाथ नाथजोगी, सोनाली नाथजोगी, पुरुषोत्तम भागवत, राहुल वाकोडे, शशिकला पतंगे, शारदा ताई, कल्याणी ताई, मोनाली वाकोडे आणि कपिल रजाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला शक्ती फाउंडेशनचे सर्व सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने अथक परिश्रम घेतले. या अनोख्या आणि संवेदनशील उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# हुडकेश्वर पोलिसांचा सराईत गुन्हेगारावर मोठा दणका; 6 महिन्यांसाठी नागपूर शहर व जिल्ह्याबाहेर हद्दपार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हुडकेश्वर पोलिसांनी सराईत गुन्हेगाराविरुद्ध कठोर कारवाई करत त्याला सहा महिन्यांसाठी नागपूर शहर व नागपूर जिल्ह्याच्या हद्दीबाहेर हद्दपार केले आहे. या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये चांगलीच खळबळ उडाली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.



हद्दपार करण्यात आलेला आरोपी गोकुल उर्फ गोलु जगदीश बडवाईक (वय 24 वर्षे) हा मानेवाडा परिसरातील दत्तू किराणा स्टोअर्सजवळ, संजय गांधी चौक येथे राहणारा असून त्याच्यावर गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रमांक 04, नागपूर शहर यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक 04/2026, दि. 2 जुलै 2026 अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम 56(1)(अ)(ब) अंतर्गत ही हद्दपारीची कारवाई केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीविरुद्ध नंदनवन व हुडकेश्वर पोलीस ठाण्यांत जबरी चोरी, प्राणघातक शस्त्र बाळगणे, अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणे, मारहाण करून दुखापत करणे अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद आहेत.

त्याच्यावर यापूर्वी अनेक वेळा प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नसल्याने अखेर हद्दपारीचा निर्णय घेण्यात आला.

या आदेशानुसार आरोपीला सहा महिन्यांसाठी नागपूर शहर व नागपूर जिल्ह्याच्या हद्दीबाहेर पाठविण्यात आले असून त्याला त्याच्या नातेवाईकांकडे राळेगाव, यवतमाळ येथे सोडण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस उप आयुक्त रश्मिता राव यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरोधात भविष्यातही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असा संदेश पोलिसांनी दिला आहे.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, हद्दपारीच्या सहा महिन्यांच्या कालावधीत संबंधित आरोपी नागपूर शहर किंवा जिल्ह्याच्या हद्दीत आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधून माहिती द्यावी. नागरिकांच्या सहकार्यामुळे अशा कारवायांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होईल, असेही पोलिसांनी नमूद केले आहे.

# एक्सप्रेसमध्ये सापडले पिस्तूल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल रेल्वेस्थानकात आलेल्या नांदेड–पनवेल एक्सप्रेसमधील जनरल डब्यातील वॉशबेसिनखालील कचरा कुंडीत एक गावठी कट्टा (पिस्तूल) आढळून आल्याने रेल्वे स्थानक परिसरात खळबळ उडाली आहे. पनवेल रेल्वे पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.नांदेड–पनवेल एक्सप्रेस (क्रमांक १७६१४) ही गाडी पनवेल रेल्वेस्थानकाच्या फलाट क्रमांक ६ वर आली होती. त्यावेळी जनरल डब्यात अर्जुनकुमार वर्मा (वय ३३) हे सफाई कामगार साफसफाई करत असताना वॉशबेसिनखालील कचराकुंडीत त्यांना एक पिस्तूल दिसून आले. ही माहिती तत्काळ रेल्वे प्रशासन व पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पनवेल रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पिस्तूल ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात ते गावठी कट्टा असल्याचे समोर आले असून ते कोणाचे आहे आणि ते डब्यात कसे आले याचा शोध पोलिस घेत आहेत. या घटनेमुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून रेल्वे पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

# मुलीशी अश्लील चाळे करणाऱ्याला अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : खारघर परिसरातील एका निवासी इमारतीमध्ये सुरक्षेची जबाबदारी असलेल्या सुरक्षा रक्षकानेच आठवर्षीय चिमुरडीसोबत अश्लील चाळे केल्याची घटना उघडकीस आली आहे. खारघर पोलिसांनी याप्रकरणी सूरजकुमार रामजितसिंग (वय ३३) याला अटक केली आहे.

सूरजकुमार हा संबंधित इमारतीत सुरक्षा रक्षक म्हणून कामाला होता. त्याच इमारतीतील आठवर्षीय चिमुरडी इमारतीजवळ खेळत असताना त्याने पीडित मुलीसोबत अश्लील चाळे केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर मुलीच्या पालकांनी खारघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी सूरजकुमार रामजितसिंग याला अटक केली. पुढील तपास खारघर पोलीस करत आहेत.

# अतिवृष्टीमुळे पनवेल महापालिकेच्या 435 नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर; प्रशासन अलर्ट मोडवर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन पूर्णपणे अलर्ट मोडवर असून बाधित नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात येत आहेत.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार आतापर्यंत सुमारे 435 नागरिकांचे चार तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले असून त्यांना चहा, नाश्ता, जेवण, पिण्याचे पाणी तसेच अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

अतिवृष्टीमुळे पाणी साचणाऱ्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत पनवेलमधील पटेल मोहल्ला व कच्ची मोहल्ला परिसरातील भारतनगर झोपडपट्टीतील 149 नागरिकांना उर्दू शाळेत, 211नागरिकांना कोळीवाडा शाळेत, तर एचओसी कॉलनी आदिवासी वाडीतील 75 नागरिकांना क्रीडा संकुलात सुरक्षितरीत्या स्थलांतरित करण्यात आले आहे. भांडार विभागामार्फत या सर्व नागरिकांना चहा, बिस्किटे, नाश्ता, पिण्याचे पाणी व इतर




आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांच्या सूचनेनुसार स्थलांतरित नागरिकांरी आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

अतिरिक्त आयुक्त, संबंधित उपायुक्त, कामोठे प्रभाग अधिकारी दशरथ भंडारी, पनवेल प्रभाग प्रभारी अधिकारी राजेश डोंगरे तसेच मुख्य निरीक्षक अरुण कांबळे हे सातत्याने निवारा केंद्रांना भेट देऊन नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेत आहेत.

### पाण्याचा निचरा करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना

जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना २४ तास सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. सखल भागातील साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी जेटिंग मशिन व जेसीबीच्या सहाय्याने गटारांमधील अडथळे व कचरा हटविण्याचे काम सुरू असून विविध ठिकाणी पाण्याचा जलद निचरा करण्यासाठी कर्मचारी कार्यरत आहेत. चारही प्रभागातील परिस्थितीवर महापालिका प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

### प्रत्यक्ष पाहणी व आढावा

खारघर येथील ड्रायव्हिंग रेंज व पांडवकडा मार्ग सुरक्षेच्या दृष्टीने बंद करण्यात आला आहे. या परिसराची अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर आणि प्रभारी अधिकारी जितेंद्र मढवी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी पनवेलमधील बांठिया शाळा, पाणी साचलेले विविध



भाग तसेच स्थलांतरित नागरिकांच्या निवारा केंद्रांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच समिती 'क' अंतर्गत कामोठे गणपती मंदिर परिसरात दोन पंपांच्या साहाय्याने रस्त्यावर साचलेल्या पाण्याचा पूर्णपणे निचरा करण्यात आला आहे.

### अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, नगरसेवक समीर ठाकूर यांनी नवीन पनवेल होल्डिंग पॉण्डची पाहणी केली

प्रभाग समिती क कामोठे सरिता संगम सोसायटी सेक्टर-06, कामोठे येथे चौथ्या मजल्यावर रूम 19 चे पीओपी कोसळले होते.या ठिकाणी कोणत्याही प्रकारची जीवित व वित्तहानी झालेली नाही तरी सदर सोसायटीस मनपाकडून यापूर्वीच स्ट्रक्चर ऑडिट करणे कामी नोटीस यापूर्वी देण्यात आलेली आहे . सदर ठिकाणची अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे , परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे ,उपायुक्त स्वरुप खारगे व उपायुक्त अभिषेक पराडकर यांनी प्रत्यक्ष पहणी केली व या संदर्भात योग्य ते सूचना केल्या आहेत.

आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी महापालिकेची सर्व यंत्रणा सज्ज असून आवश्यक ते सर्व मदतकार्य सुरू असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी दिली.

### महापौरांची पाहणी व नागरिकांना आवाहन

महापौर नितीन पाटील यांनी पनवेलमधील विविध पाणी साचलेल्या भागांची पाहणी केली. यावेळी महापालिका सदस्य सुमित झुंजारराव व दर्शना भोईर उपस्थित होते. महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाण्याचा निचरा तातडीने करण्याच्या सूचना देतानाच




नागरिकांनीही अनावश्यक बाहेर पडणे टाळावे व प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले.

तसेच महापौरांनी स्थलांतरित शिबिरांना भेट देऊन, महापालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतला, यावेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे,डॉ वैभव विधाते उपस्थित होते.

### ऑनलाईन बैठकीत परिस्थितीचा आढावा

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांनी ऑनलाईन बैठकीद्वारे आपत्कालीन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी चारही प्रभागांतील पाणी साचलेली ठिकाणे, तेथील उपाययोजना, स्थलांतरित नागरिकांना पुरविण्यात आलेल्या सुविधा याबाबत सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत महापालिकेची सर्व यंत्रणा सतत सज्ज ठेवण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

---

# युवक आधार च्या बातमीची दखल शिळफाट्याच्या झेप्टो डार्क स्टोअरवर FDA चा दणका

## समाजसेवक विनोद वास्कर यांच्या तक्रारीनंतर सुधारणा नोटीस बजावली

**दैनिक युवक आधार**
**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी :** शिळ-दिवा मार्गावर, तुळजाभवानी मंदिराजवळील झेप्टोच्या डार्क स्टोअरमध्ये सडके आणि निकृष्ट दर्जाचे पदार्थ विकले जात असल्याची तक्रार अखेर खरी ठरली आहे.

संपूर्ण घटनाक्रम

१) तक्रार: समाजसेवक विनोद शनिवार वास्कर यांनी ०५/०६/२०२६ रोजी FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांना ईमेल केले. स्टोअरमधून वास मारणारे पदार्थ घरपोच येत असल्याचा आणि FS-SAI, आरोग्य, अग्निशमन, महापालिका परवाना नसल्याचा आरोप केला.

२) दैनिक युवक आधारचा इम्पॅक्ट:११/०६ /२०२६ रोजी "शिळफाट्याच्या झेप्टो डार्क स्टोअरमध्ये सडके पदार्थ?" या मथळ्याखाली बातमी पत्रकार रमेश राऊत यांनी प्रसिद्ध केली होती.

३) FDA ची तपासणी: तक्रारीची आणि बातमीची दखल घेत अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अ.ज. वीरकर यांनी S.No.216, Hill Gaon Road, Shill Villa GE येथील स्टोअरची प्रत्यक्ष तपासणी केली.

४) सुधारणा नोटीस: सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन ठाणे यांनी १६/०६/२०२५ च्या पत्रात M/s Zepto Limited ला सुधारणा नोटीस पाठवल्याचे कळवले. अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ /२०११ अंतर्गत पुढील कार्यवाही सुरू आहे.

स्थानिकांचा संताप

"डिलिव्हरीच्या नावाखाली


दैनिक
युवक आधार
Epaper.YuvakAadhar.In
मुख्यसंपादक : भारती संतोष आमले - 9220403509
Page 6
11 Jun 2026

शिळफाट्याच्या झेप्टो डार्क स्टोअरमध्ये सडके पदार्थ?

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** :डिलिव्हरीच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे का? शिळफाटा येथील झेप्टो डार्क स्टोअरमधून वास मारणारे, निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ विकले जात असल्याचा धक्कादायक आरोप करत समाजसेवक विनोद शनिवार वास्कर यांनी थेट FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे धाव घेतली आहे.

**काय आहे प्रकरण?**
शिळ-दिवा मार्गावर, शिळ गावच्या तुळजाभवानी मंदिराजवळ झेप्टोचे डार्क स्टोअर सुरू आहे. येथून डिलिव्हरी बॉयमार्फत घरपोच खाद्यपदार्थ दिले जातात. पण या दुकानाला FSSAI परवाना, आरोग्य परवाना, अग्निशमन परवाना किंवा महापालिका परवानगी आहे का, याची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. दुकानाबाहेर नावाचा फलकही नाही.

**नागरिक संतप्त:**
स्थानिकांच्या तक्रारीनुसार, या स्टोअरमधून येणाऱ्या अनेक खाद्यपदार्थांना वास मारतो. अधिक मास आणि सणासुदीच्या काळात असे पदार्थ खाल्ल्याने अन्नातून होणाऱ्या आजारांची भीती प्रचंड वाढली आहे. स्थानिकांनी यापूर्वीही तोंडी व लेखी तक्रारी केल्या, पण प्रशासन झोपले आहे.

**FDA आयुक्तांकडे थेट तक्रार:**
FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून भेसळ आणि बोगस पदार्थांविरोधात कडक भूमिका घेतली आहे. त्याच धडाक्याची अपेक्षा करत विनोद वास्कर यांनी ५/०६/२०२६ रोजी FDA भवन, बांद्रा-कुर्ला संकुल

नागरिकांच्या जीवाशी खेळ; FDA आयुक्त मुंढे यांच्याकडे कारवाईची मागणी

येथे लेखी निवेदन दिले.

निवेदनात त्यांनी संयुक्त आयुक्त, FDA ठाणे विभाग,ठाणे महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना प्रत माहितीसाठी पाठवली आहे.

**काय मागणी आहे?**
विनोद वास्कर यांनी मागणी केली आहे की, FDA च्या तपासणी पथकाने तातडीने या डार्क स्टोअरवर धाड टाकावी. सर्व परवाने आणि स्टॉक केलेल्या पदार्थांची तपासणी करावी. नियमबाह्य आढळल्यास दुकान त्वरित सील करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा.


**सवाल प्रशासनाला:**
देवेंद्र प्रकरणानंतरही प्रशासन जागे झाले नाही का? बोगस डॉक्टरांनंतर आता बोगस डार्क स्टोअर नागरिकांच्या जिवाशी खेळत आहेत. झोपले यंत्रणा पुन्हा एखादा मृत्यू झाल्यावरच जागी होणार का?

नागरिकांच्या आरोग्यापेक्षा कंपन्यांचा नफा मोठा झाला आहे का, असा सवाल आता शिळकर उपस्थित करत आहेत.


आरोग्याशी खेळ सुरू आहे. सणासुदीला असे पदार्थ खाऊन आजारी पडण्याची भीती आहे. देवेंद्र प्रकरणानंतरही प्रशासन झोपले आहे का?" अशी प्रतिक्रिया शिळकर देत आहेत.

समाजसेवक विनोद वास्कर यांच्या ३ मागण्या

१) पुन्हा धाड: FDA पथकाने सर्व परवाने तपासावेत.


विषय :- अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६, नियम व नियमन २०११
M/s. Zepto Limited(Formerly Known as Zepto Private Limited and Kiranakart Technologies Private Limited),Ground floor situated at S.No.216, Hill Gaon Road, Shill Villa GE,Thane, Kalawa Mumbra Zone, Dist. Thane

२) लॅब टेस्ट: स्टॉकमधील सर्व पदार्थांची प्रयोगशाळा तपासणी करावी.

३) कडक कारवाई: नियमबाह्य आढळल्यास दुकान सील करून फौजदारी गुन्हा दाखल करावा.

**पुढे काय?**

सुधारणा नोटीस नंतर झेप्टोला दिलेल्या मुदतीत त्रुटी दूर कराव्या लागतील. नाहीतर परवाना रद्द, ५ लाखांपर्यंत दंड आणि फौजदारी कारवाई होऊ शकते.

सध्या कंपनीकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

**ग्राहकांसाठी सूचना**

**ऑनलाइन मागवलेला माल:**

- Expiry Date, पॅकेजिंग, सील नक्की तपासा

- शंका असल्यास FDA टोल फ्री: 1800 22 2365 किंवा FoS-CoS पोर्टल वर तक्रार करा

या कारवाईमुळे शिळ-दिवा परिसरातील इतर क्विक कॉमर्स डार्क स्टोअरही आता FDA च्या रडारवर आले आहेत.

---

# ठा.म.पा. प्रभाग क्र.२९ मध्ये पूरसदृश्य परिस्थितीची नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी केली पाहणी

**दैनिक युवक आधार**
**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी**
**दि.६, शिळफाटा (ठाणे) :** सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रभाग क्रमांक २९ मधील अनेक भागांत पावसाचे पाणी साचून पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी ४जुलै रोजी संबंधित परिसराचा प्रत्यक्ष पाहणी दौरा करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या.

पाहणीदरम्यान त्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पाण्याचा त्वरित निचरा करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आवश्यक ती उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी केली.

यावेळी स्थानिक नागरिकांनी पावसामुळे निर्माण झालेल्या समस्यांची माहिती नगरसेविकांना



दिली.

त्यावर वेदिका साहिल पाटील यांनी प्रशासनाशी समन्वय साधून लवकरात लवकर समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

प्रभागातील नागरिकांच्या अडचणीच्या काळात प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केल्याबद्दल स्थानिकांनी नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांच्या कार्याचे स्वागत केले.

---

# ब्रह्मपूर–उधना अमृत भारत एक्स्प्रेस आता दररोज

**जळगाव :** महाराष्ट्रातील खान्देश, विदर्भ तसेच गुजरात, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमधील प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. रेल्वे बोर्डाने १९०२१/१९०२२ ब्रह्मपूर–उधना–ब्रह्मपूर अमृत भारत एक्स्प्रेस गाडी त्रि-साप्ताहिक सेवेतून आता दररोज चालविण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना आठवड्यातील मर्यादित फेऱ्यांऐवजी वर्षभर नियमित प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

पूर्व किनारी रेल्वे (ईस्ट कोस्ट रेल्वे) प्रशासनाच्या आदेशानुसार या गाडीची ०८४११ ब्रह्मपूर–उधना उद्घाटन विशेष फेरी सोमवारी ६ जुलै २०२६ रोजी दुपारी ५.०० वाजता ब्रह्मपूर स्थानकावरून रवाना होणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या



माहितीनुसार ही वेळ तात्पुरती असून, अंतिम वेळापत्रकात आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

ब्रह्मपूर–उधना गाडीला दैनंदिन स्वरूप मिळावे, यासाठी पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रलचे डीआरयूसीसी सदस्य तथा धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र शिवराज कोठारी यांनी सातत्याने रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. वाढती प्रवासी संख्या, आरक्षणासाठी होणारी गर्दी आणि खांदेशातील नागरिकांची मागणी याबाबत त्यांनी रेल्वे बोर्डासह संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर रेल्वे बोर्डाने

### प्रवाशांना दिलासा

दैनंदिन सेवा सुरू करण्यास मंजुरी दिली.

खान्देशसह चार राज्यांतील प्रवाशांना फायदा

ब्रह्मपूर–उधना गाडीला दैनंदिन गाडी सोडण्याच्या निर्णयामुळे धरणगाव, अमळनेर, जळगाव, भुसावळ, नंदुरबार तसेच संपूर्ण तापी पट्ट्यातील प्रवाशांना मोठा लाभ होणार आहे. व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरीसाठी प्रवास करणारे नागरिक, धार्मिक यात्रेकरू तसेच ओडिशा व आंध्र प्रदेशमध्ये जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही सेवा अधिक सोयीची ठरणार आहे. गुजरातमधील उधना मार्गे सुरत व इतर औद्योगिक शहरांशीही प्रवास अधिक सुलभ होणार आहे.